बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.९ एप्रिल २०२५ | वर्षे४थे | अंक२३७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# २०२९ मध्ये नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान होतील!!

फडणवीसांनी दिले थेट उत्तर ; म्हणाले ◆ देशात अन् राज्यात भाजपचे सरकार ◆ उत्तराधिकार्याबद्दल विचार करण्याची ही योग्य वेळ नाही ◆ संजय राऊत यांनी केलं होतं मोदींबद्दल विधान

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:सध्या राज्यात आणि देशात भाजपचे सरकार आहे. केंद्रात भाजप एनडीए आणि राज्यात महायुतीचे सरकार आहे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला भेट दिली. त्यानंतर एक चर्चा सातत्याने होताना दिसून येत आहे. २०२९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उत्तराधिकारी कोण होणार याची चर्चा रंगू लागली आहे. दरम्यान हा उत्तराधिकारी महाराष्ट्रातून असेल असे म्हटले जात आहे. त्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव देखील घेतले जात आहे. दरम्यान आता यावर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईमधील 'इंडिया ग्लोबल फोरम' कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी २०२९ मध्ये पंतप्रधान कोण असणार यावर उत्तर दिले आहे. या कार्यक्रमात फडणवीस यांनी २०२४ मधील लोकसभा निवडणुकीचा उल्लेख केला. यावेळी त्यांनी २०२९ मधील भावी पंतप्रधान कोण असणार आणि त्यांचा उत्तराधिकारी कोण असणार यावर भाष्य केले आहे.बिकेसीमधील 'इंडिया ग्लोबल फोरम' कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी २०२९ मध्ये नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान होणार असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. २०२९ मध्ये नरेंद्र मोदीच पंतप्रधान होणार असल्याने त्यांच्या उत्तराधिकार्याबद्दल विचार करण्याची ही योग्य वेळ नाही.



## काय म्हणाले होते संजय राऊत?

खासदार संजय राऊत यांनी मुंबईमध्ये माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राजीनामा देण्यासाठी नागपूर दौऱ्यावर आले असल्याचा घणाघात केला होता. खासदार राऊत म्हणाले की, संकेत स्पष्ट आहे, माहिती बाहेर येते सप्टेंबर महिन्यात नरेंद्र मोदींनी जाहीर केल्याप्रमाणे धोरण ७५ वर्षीय झालेल्यांनी सत्तेच्या पदावर राहू नये. त्यामुळे देशाचं नेतृत्व बदलावं लागेल. कोणत्याही मंत्री प्रधानमंत्री राष्ट्रपती त्यांच्यामुळे सरसंघ चालकांनी त्यांना या त्यांच्या संघाच्या भूमिकेची आठवण करून देण्यासाठी ही चर्चा केली. दहा–अकरा वर्षांनी जाऊन नागपुरात सरसंघचालक यांना भेटावं लागलं ही काय साधी गोष्ट नाही इतक्या वर्षात कधीच गेले नाही – ईश्वराचा देखील मृत्यू झाला. राम गेले, कृष्ण देखील एका बाणाने पारध्याच्या लोक सोडून गेले. प्रत्येकाला आपली सत्ता सोडावी लागते. देव असो या मनुष्य असो. नरेंद्र मोदी यांचा राजकीय वारसदार महाराष्ट्रातून असेल, असे सूचक वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले.

## २०२९चे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींकडेच बघतो

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजकीय उत्तराधिकारी महाराष्ट्रामधून असून त्यांनी अप्रत्यक्षरित्या देवेंद्र फडणवीसांकडे इशारा केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊतांच्या या दाव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उत्तराधिकारी शोधण्याचे मुळात काहीच कारण नाही. मोदी हे आमचे नेते आहेत. अजून पुढचे अनेक काळ ते काम करणार आहेत. आमचा सगळ्यांचा आग्रह आहे की, २०२९चे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्याकडेच बघतो आहे. आमच्यासोबत पूर्ण देश बघतो आहे. त्यामुळे आता अशी चर्चा करणं योग्य होणार नाही, असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

# सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात एसआयटी नेमा

प्रकाश आंबेडकर यांची मागणी

या प्रकरणात सरकार आरोपी, मग ते तपास करू शकते?

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मंगळवारी परभणीच्या सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणाची एसआयटी अर्थात विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली. प्रस्तुत प्रकरणात राज्य सरकार आरोपी आहे. मग ते या प्रकरणाचा तपास कसा काय करू शकते? असा कळीचा प्रश्न त्यांनी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात उपस्थित केला आहे.

परभणी पोलिसांच्या मारहाणीत न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मातोश्री विजयाबाई सूर्यवंशी यांनी याविरोदता मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात राज्य सरकारविरोधात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली. सूर्यवंशी कुटुंबीयांतर्फे स्वतः प्रकाश आंबेडकर यांनी युक्तिवाद केला. त्यात त्यांनी या प्रकरणाची न्यायालयाच्या निगराणीखाली एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली.



सुनावणीनंतर पत्रकारांशी वार्तालाप करताना आंबेडकर म्हणाले की, शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात राज्य सरकार विरोधात याचिका दाखल केली होती. पान २ वर

# ठाकरेंविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका

आक्रमक:मनसे पक्षाची मान्यता रद्द करण्याची मागणी

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीनंतर जोरदार राजकारण रंगले आहे. निवडणुकीमध्ये एकही जागा न मिळालेल्या मनसे पक्षावर अनेकांनी जोरदार टीका केली. मात्र गुढीपाडव्याला गाजलेल्या भाषणानंतर राज ठाकरे हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. राज ठाकरे यांनी पाडव्याच्या दिवशी तुफान भाषण करुन सत्ताधारी व विरोधी नेत्यांवर आगपाखड केली. यावेळी त्यांनी राज्यातील मराठी भाषेच्या आग्रहावर जोर दिला. त्यांनी बँका, कार्यालये आणि आस्थापने येथे मराठी बोलली जात आहे की नाही यांची खात्री करण्याचे आदेश कार्यकर्त्यांना दिले. यामुळे संपूर्ण राज्यभरामध्ये मनसैनिक हे आक्रमक भूमिका घेऊ लागले. यानंतर आता राज ठाकरे यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली असल्याचे दिसत आहे.मनसे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राज्यभरामध्ये आंदोलन आणि आक्रमक भूमिका घेतली. तसेच अनेक बँकांमध्ये जाऊन मराठी बोलण्याचा आग्रह धरला. तसेच मराठी बोलणार नाही म्हणणाऱ्या हिंदी भाषिकांना मनसे स्टाईल दणका देखील दिला. यामुळे राज ठाकरे यांना अखेर कार्यकर्त्यांना ही प्रकार थांबवण्याचे आदेश पान २ वर



## काय म्हणाले शुक्ला?

याचिका दाखल केल्यानंतर सुनील शुक्ला यांनी प्रतिक्रिया देखील दिली आहे. यावेळी त्यांनी राज ठाकरेंवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, राजसाहेब ठाकरे तुम्ही हिंदूंना मारायचा आदेश दिला आहे, असं वाटतं. तुम्ही केवळ उत्तर भारतीयांचे नव्हे तर मराठी लोकांचेही विरोधत आहात. म्हणून मी तुमच्याविरुद्ध सुप्रीम कोर्टात जाऊन याचिका दाखल केली आहे. तुम्ही संविधानाचे उल्लंघन करू शकत नाही. हिंदूंना तुम्ही मारू शकत नाही. आम्ही तुमचा विरोध करतो, निंदा करतो आणि सुप्रीम कोर्टातून तुमच्या विरुद्ध आदेश आणणारच, असा आक्रमक पवित्रा सुनील शुक्ला यांनी घेतला आहे. यानंतर आता राज ठाकरे काय प्रत्युत्तर देणार याची राजकीय वर्तुळात उत्सुकता लागली आहे.

# दीनानाथ प्रकरणात 'अंधश्रद्धा निर्मूलन'ची उडी,

सवाल:डॉ. केळकरांना 'ते' दोन शब्द भोवणार?

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या रुग्णालयाने महिलेच्या प्रसूतीसाठी १० लाख रुपये अनामत रुक्कम म्हणून मागितले होते, असा आरोप केला जातोय. त्यानंतर या प्रकरणात रोज नवनवे खुलासे होत आहेत. डॉ. धनंजय केळकर यांनी ७ एप्रिल रोजी पत्रकार परिषद घेत राहू–केतूचा उल्लेख करून १० लाख रुपयांच्या डिपॉझिटसंदर्भात




स्पष्टीकरण दिले. त्यानंतर आता याच दोन शब्दांवर आक्षेप घेत अंधश्रद्धा निर्मुलन संस्थेने मोठी मागणी केली आहे.डॉ. धनंजय केळकर यांच्या वक्तव्यावर अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आक्षेप घेतला आहे. पुण्याच्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य विशाल विमल यांनी याबाबत समितीची भूमिका मांडली आहे. राहू केतू असल्यामुळे १० लाख रुपये डिपॉझिट लिहून दिले, असा अशास्त्रीय दावा डॉ. केळकर यांनी केला आहे. एखादा रुग्ण जर दगावला त्यावेळीही रुग्णालय राहू केतू होता असं सांगणार का? विज्ञान शाखेचे असणारे डॉ. केळकर आणि घैसास यांना शास्त्रीय ग्रहाबद्दल माहिती नसणे हे अत्यंत धक्कादायक पान २ वर



**बीड:** येथील जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. अविनाश गंडेल यांची कन्या सोनिया मनीषा अविनाश गंडेल यांची न्यायाधीशपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना ॲड. अविनाश गंडेल, रिपाइंचे जेष्ठ नेते राजू जोगदंड, ॲड. पटेल, ॲड. माने,ॲड.वडमारे, आनंद भाऊ वीर, मोहन खेमाडे, बबन शिंदे, समीर काझी आदी.

# अजितदादांना संताप झाला अनावर!

चर्चेतले:माणिकराव कोकाटे बैठकीला उशिरा पोहोचले

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते तथा राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कर्जमाफीबाबत केलेल्या विधानामुळे चांगलाच वाद झाला होता. त्यांनी केलेल्या विधानाचा निषेध करून विरोधकांनी त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी केली होती. त्यानंतर कोकाटे यांनी त्यांनी केलेल्या विधानाबाबत दिलगिरी व्यक्त केली होती. असे असतानाच आता बैठकीला अर्धात उशिराने पोहोचल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोकाटे यांना खडे बोल सुनावले असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. दर मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी ही बैठक झाली. आजच्या बैठकीला कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे अर्धा तास उशिराने पोहोचले. याच



कारणामुळे अजित पवार संतापले होते. सोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनता दरबारालाही माणिकराव कोकाटे अनुपस्थित राहात होते, या सर्व बाबींचा आढावा अजित पवार यांनी या बैठकीत घेतला.दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीला अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. यात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचाही समावेश होता.

माणिकराव कोकाटे काही दिवसांपूर्वी नाशिकच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यावर असताना त्यांनी अवकाळीमुळे शेतमालाच्या नुकसानीची पाहणी केली होती. याच पाहणीदरम्यान एका शेतकऱ्याने पान २ वर

जयभिम महोत्सव

डॉ.राजेंद्र गोणारकर यांचे मत

# बाबासाहेबांनी समतेची बीजे रुजविली

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:आपल्या बौद्धिक सामर्थ्य,अगाध ज्ञान, प्रचंड अभ्यास आणि लढ्यांच्या जोरावर इथली माणूसपण नाकारणारी मूल्यव्यवस्था नाकारली. त्यामुळे माणूस गुलामीतुन मुक्त झाला.एवढे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मानव जातीसाठी केले. त्यातून समतेची बीजे रुजली गेली. असे परखड मत डॉ.राजेंद्र गोणारकर यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, दि.४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मंगळवार (दि.८) एप्रिल रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.




त्यावेळी डॉ.राजेंद्र गोणारकर बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून दत्तात्रय क्षीरसागर, प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश साबळे, उत्तम पवार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख गौतम चोपडे विचार मंचावर उपस्थित होते.यावेळी उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना, डॉ.राजेंद्र गोणारकर म्हणाले की, त्या काळी अतिशय विपूल परिस्थिती असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज जागृतीसाठी व न्याय हक्कासाठी विविध वृत्तपत्रे सुरु केली.तसेच अंधःकारात खितपत पडलेल्या समाजाला, बौद्ध धम्माचा पर्याय देवून समाजच्या जीवनाचा उद्धार केला.असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मनोहर सिरसट यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पांडुरंग सुतार तर आभार ड.राजेश शिंदे यांनी केले. दरम्यान जयभिम महोत्सवातील उर्वरित कार्यक्रमांना आंबेडकरी जनतेने उपस्थित रहावे.असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

### आज होणार असे कार्यक्रम

जयभिम महोत्सवात बुधवार (दि.९) रोजी सकाळी ११ ते ५ विद्रोही कवि संमेलन तर सायं ६ वाजता प्रा.जयमंगल धनराज यांचे व्याख्यान होणार आहे.

# वक्फ कायद्याविरोधात हिंसक तणाव

धग:आंदोलकांनी पोलिसांची वाहने पेटवली

पुण्यभूमी प्रतिनिधी

कोलकाता: नुकतेच संदेचे अधिवेशन पार पडले. हे अधिवेशन वादळी ठरले. कारण या अधिवेशनात वक्फ संशोधन विधेयक सादर करण्यात आले. हे विधेयक लोकसभेत आणि त्यानंतर राज्यसभेत मंजूर करण्यात आले.देशभरात अनेक ठिकाणी या विधेयकाचे स्वागत करण्यात आले. तर काही ठिकाणी विधेयकाविरुद्ध आंदोलने केली जात आहे. बंगालमध्ये या कायद्यावरून आंदोलन पेटले आहे. पोलिस



आणि आंदोलक यांच्यात झटापट झाल्याची माहिती समोर येत आहे.पश्चिम बंगालमधील मुरशीदाबाद जिल्ह्यात उमरपूर–बानिपूर परिसरात आंदोलनाला पान २ वर

### वक्फ सुधारणा विधेयक कायद्याच्या कचाट्यात?

वक्फ संशोधन विधेयकाल राष्ट्रपतींनी देखील मंजूरी दिली आहे. या विधेयकांचे रूपांतर आता कायद्यात झाले आहे. अनेक ठिकाणी या कायद्याचे स्वागत तर काही ठिकाणी विरोध केला जात आहे. या विधेयकाविरुद्ध जवळपास १५ याचिका सुप्रीम कोर्टात दाखल झाल्या आहेत. या बिलाविरुद्ध अनेक याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत.

## अमेरिका असंतोष

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफविरोधात आज अमेरिकेत हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी ट्रम्प यांच्याशिवाय एलॉन मस्क यांच्याविरोधातही घोषणा दिल्या. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा संताप आंदोलकांच्या घोषणांतून व्यक्त होत होता आणि ट्रम्प यांनी लागू केलेल्या नव्या दरवाढीमुळे जगभरातील स्टॉक मार्केट आज अक्षरशः कोसळले. सकाळी सुरुवात झाल्यापासूनच बाजार कोसळण्याचे संकेत मिळाले आणि त्यातून ट्रम्प यांच्या मनमानी धोरणाची झलक पाहायला मिळाली होतीच. आजचे आंदोलन हे ट्रम्प यांच्या प्रशासनाविरोधातील सर्वात मोठे आंदोलन होते हे अनेकांनी नमूद केले आहे आणि हे आंदोलन ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे अमेरिकन लोकांच्या मनातील राग यानिमित्ताने दिसून आला आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे केवळ जास्त कर द्यावे लागतात हा एकमेव मुद्दा नाही, तर हजारो लोकांच्या नोकऱ्या जाऊन ते बेरोजगार होणार आहेत. तसेच त्यांना निवृत्तीनंतर जे लाभ मिळत असतात त्यांना चांगलीच कात्री बसणार आहे. लोकांच्या मनातील राग हा आहे.

अमेरिकेत मध्यमवयीन तसेच वृद्ध नागरिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे निवृत्तीनंतरच्या लाभांना तेथे अत्याधिक महत्त्व आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे अमेरिकन नागरिकांना या लाभांवर पाणी सोडावे लागणार आहे. त्यामुळे लोक रस्त्यावर उतरले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आंदोलनातील लोकांचा राग जसा वाढत आहे तशीच त्यामागील उत्स्फूर्तता वाढत आहे. अर्थात ट्रम्प यांच्यावर याचा परिणाम होणार नाही, कारण त्यांनी असे म्हटले आहे की, काही मिळवायचे असेल तर काही गमवावे लागतेच. अनेक जागतिक नेत्यांनी ट्रम्प यांच्याशी टॅरिफवर बोलणी केली आहेत आणि त्यात जपानचा समावेश आहे तसेच ब्रिटनचा समावेश आहे. पण ट्रम्प त्यांचे ऐकतील असे वाटत नाही, असे तज्ज्ञांना वाटते. ट्रम्प यांच्या धोरणाविरोधात सर्वप्रथम नॅशनल मॉल येथे निदर्शने आयोजित केली गेली आणि ती लाट हळूहळू सर्व जगभर पसरत आहे. इतर अनेक शहरांमध्ये असेच गट आंदोलन करत आहेत आणि त्यांचा रोख आहे तो ट्रम्प यांच्यावर. ट्रम्प, मस्क आणि अनेक अब्जाधीश मिळून आम्हाला बरबाद करू पाहत आहेत असा त्यांचा आरोप आहे. त्याला ट्रम्प यांनी काहीही उत्तर दिले नाही. ट्रम्प यांच्या रेसिप्रोकल टॅरिफमुळे जगाला हादरा बसला आहे तरीही भारतावर त्याचा सर्वात कमी परिणाम झाला आहे असे काहींचे म्हणणे आहे. त्याच्या टॅरिफमुळे जगभर शॉकवेव्हज निर्माण झाल्या आहेत हे निश्चित आहे; परंतु जागतिक बाजारपेठा मात्र धक्क्यात आणि गोंधळाच्या स्थितीत आहेत हे लपवून चालणार नाही. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे मुक्त व्यापाराला धक्का बसला असला तरीही त्याचा धक्का अगदीच गंभीर जखमी करणारा नसेल असे काहींनी म्हटले आहे. पण अमेरिकेच्या टॅरिफ वॉरमुळे जागतिक बाजारावर त्याचा विपरित परिणाम होणार आहे हे निश्चित. या टॅरिफ वॉरमुळे फ्री ट्रेडला धक्का बसला असला तरीही त्यामुळे मोठे गुंतवणूकदार खासगी इक्विटी विकून टाकण्याचा विचार करत आहेत, हे कोणत्याही बाजाराला धोकादायक आहे. सर्व जगभरात ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे लोक रस्त्यावर आले आहेत आणि त्यांना चिंता आहे ती आपल्या भवितव्याची.

जागतिक बाजारपेठांमध्ये ट्रम्प यांच्या शुल्कामुळे प्रचंड आर्थिक उलथापालथ झाली आहे आणि त्यामुळे गुंतवणूकदारांना भीती किंवा भावनेने प्रेरित होऊन निर्णय न घेणे हीच आज सर्वात महत्त्वाची बाब बनली आहे. त्याला लोक कसे सामोरे जातात यावर ट्रम्प यांच्या या टॅरिफ योजनेचे यशापयश अवलंबून आहे. आर्थिक बाजारपेठ ही अनिश्चिततांनी भरलेली आहे, त्यामुळे कोणत्याही क्षणी कसलाही आततायी निर्णय न घेता आलेली परिस्थिती स्वीकारून शांतपणे निर्णय घेणे ही आजची जबाबदारी आहे हे ओळखून लोकांनी वागायला हवे. ट्रम्प यांच्या व्यापार करामुळे मुंबई शेअर बाजारात उलथापालथ झाली आहे आणि तेथे शेअर्स कोसळले आहेत, त्यामुळे सेन्सेक्स २६०० अंकांनी कोसळला आणि ही मोठी पडझड आहे. निफ्टीचीही हवालदिल अवस्था झाली आहे आणि त्यामुळे सर्व क्षेत्रांतील गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचा निर्णय एकट्या अमेरिकेपुरता मर्यादित नाही, तर सर्व जगाला त्याचा फटका बसला आहे. ही अत्यंत दयनीय परिस्थिती आहे. यातून अमेरिकेतच नव्हे, तर जगभरात मंदी ओढवणार आहे. या परिस्थितीमुळे जगाला १९२९ च्या जागतिक मंदीची आठवण आली, तर नवल नव्हे. त्यावेळी अमेरिकेत अशीच मंदी आली होती आणि त्यानंतर अमेरिका कोसळली होती. तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष होते हर्बर्ट हूव्हर. त्यांच्या काळात स्टॉक मार्केट कोसळले होते आणि कित्येकांनी आत्महत्या केल्या होत्या. आज एवढी परिस्थिती नसली तरीही अमेरिका आजही तितकीच दयनीय स्थितीत आहे हे या लोकांच्या आंदोलनामुळे सिद्ध झाले आहे. आज अमेरिकन जनता रस्त्यावर आहे आणि त्याचे पडसाद सर्व जगभर उमटत आहेत. आज अमेरिकेत करण्यात आलेली निदर्शने ही सर्वात मोठी होती, असे आता सांगण्यात येत आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे आणखी एक गंभीर परिणाम समोर आला आहे आणि तो म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेला धक्का बसला आहे. त्यामुळे धोक्याचे संकेत मिळाले आहेत. त्यातून जग कसे सावरणार हे आता प्रत्येक देशावर अवलंबून आहे. उद्योगांमध्ये घसरण झाली आणि प्रत्युत्तराच्या धमक्या यांची एक लाट आली आहे. त्यामुळे जगभर एक प्रतिस्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे आणि चीनने अमेरिकेवर गुंडगिरी केल्याचा आरोप केला, तर युरोपियन युनियनने अमेरिकेवर तसेच कर लावण्याची धमकी दिली आहे. व्यापार युद्ध आणि शुल्क युद्धामध्ये कुणीही विजेता नसतो असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते म्हणाले.

# धार्मिक बाबतीत ढवळाढवळ?



भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लोकशाही नियंत्रित करणारा सर्वोच्च कायदा आहे. या संविधानात मूलभूत अधिकार, निर्देशात्मक तत्त्वे आणि नागरिकांचे कर्तव्य यांचा समावेश आहे. त्यामुळे भारतीय नागरिक हा सगळ्यांचं स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतो. काही देशात वेगवेगळ्या मर्यादा दिसून येतात.त्यामुळे देशातील कोणतीही शक्ती संविधानिक हक्क हिरावून घेऊ शकत नाही. ही मोठी ताकद भारतीय नागरिकांना संविधानाने दिली आहे. ते संविधान आपण स्वतःप्रत अर्पण केले आहे. त्यामुळे सरकारे येतील जातील पण, संविधानिक हक्क, अधिकार, न्याय कोणिही हिरावून घेऊ शकत नाही. कोणी बहुमताच्या जोरावर संविधानावर घाला घालून हे हक्क अधिकार हिरावून घेत असेल तर त्यांना अटकाव करण्याची ताकदही भारतीय नागरिकांना दिली आहे. असो, सांगण्याचा मतलब म्हणजे सध्या संविधानिक अधिकार गाजवण्यावर टांगती तलवार दिसते.असे म्हटले तर योग्य होईल.कारण, गेल्या काही वर्षांत अमुक घोषणा दे अन्यथा मारण्याची भाषा ऐकू येते. नुकतेच आपल्या संसदेने मुस्लिम बांधवांसाठी वक्फ कायद्यात सुधारणा करून नवी उमेद निर्माण केली आहे.ती उमेद भारतीय संविधानाच्या कलम २६ वर घाला घालते?भारतीय संविधानाच्या कलम २६ मध्ये धार्मिक बाबींमध्ये स्वतःचे व्यवहार व्यवस्थापित करण्याचा अधिकार देते. हे कलम संविधानाच्या भाग ३ मध्ये आहे. संविधानाच्या कलम २६ मध्ये प्रत्येक धार्मिक संप्रदाय किंवा त्याच्या कोणत्याही विभागाला धार्मिक आणि धर्मादायी हेतूंसाठी संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांची देखभाल करण्याचा अधिकार देते.धर्माच्या बाबतीत स्वतःचे व्यवहार व्यवस्थापित करण्याचा अधिकार तसेच जंगम आणि स्थावर मालमत्तेची मालकी घेण्याचा आणि संपादन करण्याचा अधिकार देते. कायद्यानुसार अशा मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार आहे. नागरिकांच्या सार्वजनिक सुव्यवस्थेवर, नैतिकतेवर आणि आरोग्यावर परिणाम होत नसेल तर राज्याला या बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही.धार्मिक संप्रदायांना मंदिरात कोण प्रवेश करू शकते आणि पूजा करू शकते हे ठरवण्याचा अधिकार आहे. आता वक्फ सुधारणा विधेयक जे संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर केले

पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

ते भारतीय संविधानातील कलम २६ चे उल्लंघन आहे? कारण, स्पष्ट यात उल्लेख आहे की, धार्मिक बाबतीत ढवळाढवळ चालणार नाही. नागरिकांच्या सार्वजनिक व्यवस्थेवर आणि आरोग्यावर परिणाम होत असेल तर हे विधेयक योग्य होईल. पण,तशी परिस्थिती होती का?हा प्रश्न. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५-२८ मध्ये धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आहे. पण, सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य यांच्या अधीन राहून. यात मुस्लिम समाज अधिन नव्हता?कलम २५ ते २८ नुसार धर्म स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. या कलमांमुळे भारतात धर्मनिरपेक्ष राज्य सुनिश्चित झाले आहे. मात्र, धर्माधित कायदे केले जात आहे.जी एसटी,सीएए, कलम ३७० ,वक्फ बोर्ड कायदा आदी कायदे तत्कालीन आणि विद्यमान सरकारचे यामुळे देशातील बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, महागाई याबाबत कधी संसदेत रात्र रात्र चर्चा होईल? सर्वसामान्यांना मरण्यापेक्षा जगणं महाग झालंय त्यावर उपाय म्हणजे मरणाला कवटाळले पाहिजे अशी स्थिती. याबाबत काही करता आले असते?

अनुच्छेद २६(अ) धार्मिक आणि धर्मादाय हेतूंसाठी संस्था स्थापन करण्याचा आणि देखरेख करण्याचा अधिकार. धार्मिक संस्था स्थापन करण्याचा आणि देखरेख करण्याचा अधिकार प्रत्येक धार्मिक संस्थेला देण्यात आला आहे. त्यामुळे वक्फ बोर्ड ही धार्मिक संस्था मुस्लिम समाजातील बांधवांसाठी त्यांच्या धार्मिक कार्यासाठी असेल तर त्यात सुधारणा धर्मदाय किंवा संबंधित बोर्ड करेल.यात राज्याने म्हणजे सरकारने हस्तक्षेप करावा?वक्फ बोर्डतील सुधारणा मान्य होतीलही पण, इतर धर्माच्या बाबतीत ह्या सुधारणा केल्या जाव्यात का? वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक भारतीय संविधानाच्या कलम १४ चे सुध्दा उल्लंघन आहे.भारतीय संविधानाच्या कलम १४ मध्ये कायद्यासमोर समानता आणि कायद्यांचे समान संरक्षण याची हमी दिली आहे. या कलमांमुळे, प्रत्येक व्यक्तीला पार्श्वभूमीची पर्वा न करता, कायद्यानुसार समान वागणूक मिळते.या विधेयकामुळे धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणि समानतेच्या कलमाचही उल्लंघन करत. राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही तसेच जात, वंश आणि धर्म, जन्मस्थान किंवा लिंग यावर आधारित कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाकारतो. यावरून तर धर्मा बाबतीत भेदभाव आहे?कायदा सर्व लोकांना समान रीतीने लागू झाला पाहिजे. समाजातील त्यांची स्थिती - श्रीमंत किंवा गरीब, तरुण किंवा वृद्ध, त्यांचे लिंग, वंश, संस्कृती, धर्म किंवा इतर कोणत्याही गुणधर्माची पर्वा न करता. भारतीय संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये समानतेचा अधिकार समाविष्ट आहे. या कलमांमध्ये भेदभाव प्रतिबंध, संधीची समानता, अस्पृश्यता निर्मूलन आणि पदव्यांचे निर्मूलन यांचा समावेश आहे. त्यामुळे इथं कुणिही महाराज वगैरे पदव्या लावू शकत नाही.संविधानाने इथल्या प्रत्येक नागरिकाला जी ताकद दिली आहे ती खिळखिळी झाली आहे?तो कोणत्याही जाती धर्माचा असो .आज जातवार आंदोलने होत आहेत.ही कुणाची देन आहे? याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.अन्यथा प्रत्येक धर्मावर गंडांतर येईल आणि या सगळ्या उद्दिष्टानंतर फक्त उरेल तो हिंदू राष्ट्राचा अजेंडा!

## पान एक वरून

**सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात**

त्या याचिकेवर आज औरंगाबाद न्यायालयात सुनावणी होती. मी या प्रकरणी याचिकाकर्त्यांकडून न्यायालयात बाजू मांडली.न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्यावर मॅजिस्ट्रेटने चौकशी केल्यानंतर पुढे काय करावे? याविषयी कायदा अपूर्ण आहे. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणात नियमावली तयार करावी, अशी मागणी न्यायालयाकडे केली. विशेषतः या प्रकरणात आम्ही ड्खढ नेमण्याची मागणीही केली आहे. ही ड्खढ कोर्टाने नेमावी आणि कोर्टाच्या अधिपत्याखाली ती चालावी.सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात आरोपी हे राज्य सरकार आहे. त्यामुळे प्रकरणात आरोपी असलेले राज्य सरकार त्याच प्रकरणाचा तपास कसा करू शकतो?, असा युक्तिवाद ही कोर्टात केला. बदलापूर प्रकरण आणि परभणी प्रकरण एकसारखेच आहे. बदलापूर प्रकरणी तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली सुरू आहे, याही प्रकरणात तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावा अशी मागणी आम्ही केली, असे आंबेडकर म्हणाले. प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी सीआयडी अर्थात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागालाही आरोपी करण्याचे संकेत दिले. मध्यंतरी उखऊने सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेत चौकशी केली होती. पुढच्या सुनावणीच्यावेळी आम्ही उखऊ ला आरोपी करू. हायकोर्टाकडून राज्य सरकारसह संबंधित यंत्रणांना नोटीस जारी करण्यात आली आहे आणि २९ एप्रिल पूर्वी आपले म्हणणे सादर करायला सांगितले आहे. या प्रकरणी २९ एप्रिलला पुढील सुनावणी होईल, असे ते म्हणाले.

**दीनानाथ प्रकरणात 'अंधश्रद्धा**

आहे, असे विशाल विमल म्हणाले आहेत. तसेच वैद्यकीय आयोगाने. डॉ केळकर यांचा डॉक्टरकीचा परवाना रद्द करावा अशी मागणीही त्यांनी केल आहे. दरम्यान, आता या प्रकरणात ज्या डॉ. सुश्रुत घैसास या डॉक्टरांवर आरोप होत आहेत, त्यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील पदावरून आपला राजीनामा दिलेला आहे. लवकरच या प्रकरणातील गुन्हेगारांवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी केली जात आहे.

**डॉ. केळकर नेमकं काय म्हणाले होते? :** डॉ. केळकर यांनी यांनी पत्रकार परिषद घेऊन १० लाख अनामत रकमेच्या आरोपांवर स्पष्टीकरण दिले. आमच्या रुग्णालयात डिपॉझिट मागण्याची पद्धत नाहीये, असे त्यांनी सांगितले होते. तसेच डॉक्टरांनी डिपॉझिट मागण्याची पद्धत आमच्याकडे नाहीये. माझ्याकडे हा रुग्णाच्या ॲडमिशनचा पेपर आहे. या पेपरवर खर्चाचे अंदाजपत्रक असे लिहिलेले आहे. प्रत्येक रुग्णाला हा पेपर दिला जातो. हा फक्त भिसे नव्हे तर प्रत्येक रुग्णाला हा पेपर दिला जातो. या पेपरवर कोणते डॉक्टर शस्त्रक्रिया करणार आहेत? त्याला खर्च किती येईल? याबाबत माहिती दिलेली असते. या पेपरवर डिपॉझिट लिहिण्याची पद्धतच नाही. परुंतु काही कारणांमुळे डोक्यात राहू-केतू डोक्यात आला. डॉक्टरांनी एक चौकोन करून १० लाक रुपये डिपॉझिट म्हणून लिहिलं आहे. ही गोष्ट खरी आहे. पण असं कोणीही लिहित नाही. मी इथे रोज दहा शस्त्रक्रिया करतो. मी माझ्या आयुष्यात अशा प्रकारे काहीही लिहून दिलेलं नाही, असं स्पष्टीकरण केळकर यांनी दिलेलं आहे.

**ठाकरेंविरोधात सुप्रीम**

द्यावे लागले. मात्र हिंदी भाषिकांना त्रास दिल्यामुळे मनसे पक्षाची मान्यता रद्द करावी अशी मागणी केली जात आहे. याबाबत सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे.मुंबईत राहणारे आणि महाराष्ट्रात नोंदणीकृत राजकीय पक्ष उत्तर भारतीय विकास सेनाचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी राज ठाकरेंविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. त्याच्याविरोधात याचिका देखील दाखल केली आहे. राज ठाकरे यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. हिंदी भाषिकांवर मनसे कार्यकर्ते हल्ले करत असल्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा न बोलणाऱ्या उत्तर भारतीयांविरुद्ध कथित द्वेषपूर्ण भाषण, लक्ष्यित हिंसाचार आणि धमक्यांसंबंधी अनेक प्रकरणांमध्ये कारवाईची मागणी करणारी याचिका मनसेविरोधात दाखल करण्यात आली आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळामध्ये चर्चांना उधाण आले आहे.

**वक्फ कायद्याविरोधात**

हिंसक वळण लागले आहे. या वेळी आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली आहे. पोलिसांची वाहने पेटवली गेली आहेत. राष्ट्रीय महामार्ग देखील जाम केला गेला आहे. पोलिसांच्या वाहनाला यंग लावल्याने येथे सध्या तानावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी या ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवला आहे. आंदोलकाना पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला आहे. हा कायदा सरकारने मागे घ्यावा अशी मागणी या आंदोलकांची आहे. वक्फ कायद्याला देशात अनेक ठिकाणी विरोध केला जात आहे. पोलिसांनी मोर्चा रोखण्याचा प्रयत्न केला त्यावेळेस पोलिसांवर आंदोलकांनी विटांचा मारा केला. त्यानंतर रस्ता जाम केला. सध्या त्या परिसरात तानावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**अजितदादांना संताप झाला**

कर्जमाफी होणार का? असा सवाल कोकाटे यांना केला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना कोकाटे काहीसे संतापले होते. कर्जमाफीच्या पैशांचं काय करता. लग्न, साखरपुडे यासाठी हे पैसे वापरले जातात. तसेच कर्जमाफीतून मिळालेल्या पैशांचा उपयोग शेतीसाठी केला जातो का? असा सवालही त्यांनी केला होता. त्यांच्या याच विधानानंतर वाद झाला होता. विरोधकांनी त्यांनी मागावी तसेच पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. नंतर कोकाटे यांनी केलेल्या विधानाबाबत दिलगिरी व्यक्त केली होती.

## पान सहा वरून

**पशूसंवर्धन विभागाचे काम**

पाठपुरावा करून पशुधन विकास अधिकारी संवर्गातील पदे भरण्याचा निर्णय घेतला. यापैकी सरळसेवा जाहिरात क्र. १२/२०२२ मधील प्रतिक्षायादीतील ११ पदे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित २७९५ पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आले असून लवकरात लवकर भरती प्रक्रिया राबविण्यात यावे, असे एमपीएससीला कळविण्यात आले आहे. ही रिक्त पदे भरल्यानंतर विभागाचे कामकाज अधिक वेगाने होऊन ग्रामीण भागातील पशुपालक तसेच शेतकरी बांधवांना चांगल्या दर्जाची सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

**ट्रेडिंग कंपनीवाल्याचा मनमानी**

लूट करत असल्याचे समजले जाते आहे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे त्यामुळे चिंचोली माळी येथील गावात स्वायाबीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनी आपली आर्थिक लुट होणार नाही व यांची काळजी घ्यावी तसेच मनमानी भावाने स्वयाबीन विक्री करु नये कारण चिंचोली माळी येथील गावात ट्रेडिंग कंपनीवाल्यानी मनमानी भाव ठरवुन खरेदी सुरू आहे तसेच ट्रेडिंग कंपनीवाले स्वायाबीन विक्री करताना वजन वाढवण्यासाठी काळा बाजार करत असल्याचे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे त्यामुळे चिंचोली माळी येथील गावात स्वायाबीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**'सुताड' च्या टीम ने हाती**

म्हणाल्या, अभिनय हा माझ्या रक्ता रक्ता भिनलेला आहे. संसाराचा गाडा ओढतांना या कले कडे थोडे दुर्लक्ष झाले होते. माझ्यातील अभिनय व कलेच्या गुणवत्तेमुळे या चित्रपटात मध्यवर्ती भूमिका मिळाली आहे हे अभिमानास्पद आहे. या पूर्वी अनेक नाटक व डॉक्यूमेंट्री मध्ये अभिनय साकार केला आहे.योग्य कलाकारांच्या निवडीसाठी या चित्रपटाने प्रत्येक ठिकाणी पैकीच्या पैकी गुण मिळवले आहेत. दिग्दर्शक शिंदे यांनी एक छान कौटुंबिक कथा या चित्रपटाच्या स्वरूपात मांडली आहे. एकत्र कुटुंब पद्धतीतील नाती गोती ही आजच्या काळात अत्यंत महत्वाच्या वळणावर आहे. हा संदेश प्रेक्षकांपर्यत पोहचविण्यासाठी चित्रपटाची शुटिंग लवकरच सुरू होईल.चित्रपटाची स्क्रिप्ट आणि पोस्टच्या लॉन्चिंग सोहळ्यानंतर आता 'सुताड' सिनेताच्या टीमने चित्रपटाची जोरदार प्रसिद्धी सुरू केली आहे. एकंदरीत पाहता हा चित्रपट केवळ प्रेक्षकांना सिनेमागृहापर्यंत खेचून आणणार नाही, तर त्यांच्या मनात कायमच घर करेल यात शंका नाही. आयुष्याकडे बघण्याचा अगदी वेगळा विचार 'सुताड' लवकरच घेऊन येत आहे.

**कला केंद्राच्या नावाखाली**

मोडत आहे काहींचा मोडला आहे अनेक जण कर्जबाजारीपणा मुळे आत्महत्या करत आहे मध्यंतरी उपअधिक्षक कुमावत साहेबांनी यांनी तिन्ही केंद्रावर छापा मारून यांचे लायसन्स रद्द केले होते मात्र मागील काही दिवसापासुन हे केंद्र परत सुरू झाली आहेत पोक्सोसारखे गुन्हे दाखल होऊन ही या केंद्रांना परवानगी कोणी व कशी दिली हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकाना पडत आहे राजकारणी व पोलीस प्रशासन या व्यवसाया कडे डोळेझाक करत आहेत चार लोकांचे हित सांभाळण्या पेक्षा अनेकांचे संसार कशे वाचतील या कडे पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची नागरिकांची मागणी आहे.

**तुगावच्या पोलीस पाटीलांचा**

यांना ही या दिमाखदार सोहळ्यात गौरविण्यात आले. याबद्दल राज्यभरातून शुभेच्छा आणि कौतुक होत आहे या प्रसंगी राज्यध्यक्ष श्री.बाळासाहेब शिंदे आणि संस्थापक श्री. भिकाजी पाटील यांनी पोलीस पाटील यांच्या विविध मागण्या मा. राज्यमंत्री भोयर साहेब यांचे मार्फत मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या पर्यंत पोहोचवून त्या पूर्ण करण्याबाबत विनंती केली. या कार्यक्रमासाठी धाराशिव पोलीस पाटील संघाचे जिल्हाध्यक्ष मा.श्री. हनुमंत देवकते,राज्यातील सर्व जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष आणि पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**कृषी मंत्र्याची हाकालपट्टी**

पक्षाचे केज तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत आज तहसील कार्यालय केज येथे निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे यावेळी युवासेना तालुका प्रमुख किशोर घुले , उपशहर प्रमुख पप्पू ढगे युवासेना तालुका सचिव ऋषिकेश घुले , पप्पू कोल्हे ,कृष्णा घुले , दत्ता तपसे ,यांच्यासह अनेक शिवसेना युवासेना पदाधिकारी उपस्थित होते .

**आदित्य फार्मसिच्या विद्यार्थ्यांची**

याबाबत अनेकदा मौन बाळगले जाते. परिणामी या आजाराविषयी गैरसमजुती वाढण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. गैरसमजुती न वाढवता बाधित मुलांनाही समाजात समान हक्काने जगता आले पाहिजे त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे काळाची गरजेचे आहे असे आदित्य फार्मसीचे प्राचार्य, डॉ. कुमार सुरवसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मोराळे यांनी केले. यावेळी त्यांनी मुलांना एचआयव्ही आजारासंबंधी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर वाघमोडे यांनी तर आभार प्रा. विठ्ठल मुळे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मोराळे,चेतन शिंदे प्रयोगशाळा तंत्रज्ञ आदित्य फार्मसि बीड यांनी परिश्रम घेतले.

**पालीच्या आनंदवनात**

आले. सर्वच युवकांनी आगळावेगळा विधायक कार्यक्रम घेतल्याने त्यांच्या पुढाकाराचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे स्वर्गीय आदित्य वाघमारे मित्र मंडळाचे प्रदीप सोनटक्के, अमर शेख, अर्णव सोनटक्के, आकाश सोनटक्के दत्ता शेरकर, महादेव कांबळे, समाधान पाईक, मुन्ना राऊत, रोहित सोनटक्के, आदित्य राऊत राहुल पाईक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## पलावा येथे राम नवमीनिमित्त भव्य पालखी यात्रा

**कल्याण :** गोल्फ लिंक्स फेडरेशन, कासा बेला गोल्ड आणि कासा बेला फेडरेशन यांच्या वतीने राम नवमीनिमित्त पलावा येथे भव्य रथयात्रा आणि पालखी यात्रा काढली होती. या यात्रेला पलावातील भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या यात्रेत मनसेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांच्यातर्फे भव्य स्वागत करण्यात आले. राजू पाटील यांच्या पत्नी योगिता पाटील यांनी पालखीचे स्वागत करत दर्शन घेतले. तसेच डोंबिवली भाजपाचे आमदार तथा प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ही आपल्या परिवारासह पालखीचे दर्शन घेतले. या यात्रेमध्ये सामाजिक कार्यकर्ते चेतन तायशेट्ये आणि मनसेचे पदाधिकारी योगेश पाटील यांची उपस्थिती होती.

## वेचक

### नवीन ड्रेनेज चेंबर्स बनवले, पण त्यावर झाकणे नसल्याने धोकादायक

**डोंबिवली :** डोंबिवली एमआयडीसी, मिलापनगर, गणेश विसर्जन तलाव रोडवरील श्रीधर सुदामा सोसायटी RM ८ समोर एमआयडीसी कडून नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात आली असून काही ड्रेनेज चेंबर्सवर झाकणे अद्याप बसवली नाहीत. ही चेंबर्स बनवून १५ दिवस झाले तरी अद्याप यावर झाकणे बसविण्यास मुहूर्त मिळाला नाही. सदर ही ड्रेनेज चेंबर्स अंदाजे सहा फुटांपेक्षा अधिक खोलीची आणि तीन फुट गोल व्यासाची असून त्यात पाणी पण जमा झाले आहे. विशेष म्हणजे सदर चेंबर्स भोवती कठडा बांधला नसल्याने रस्ता आणि चेंबर्स यांची लेव्हल एकच झाली आहे. जोपर्यंत झाकणे बसवली जात नाही तोपर्यंत कमीतकमी सदर उघड्या नवीन चेंबर्स भोवती बॅरीकेट/मोठे दगड असे सुरक्षाकवच लावले पाहिजे जेणेकरून त्यात चुकून एखादा व्यक्ती किंवा दुचाकीवाला पडला गेला नाही पाहिजे.

### अखेर रिल्याक्स बारवर हातोडा

**डोंबिवली :** डोंबिवली मानपडा रोडवरील चार रस्ता येथे असलेल्या रिल्याक्स बार व सभोवतालच्या दुकानावर केडीएमसी प्रशासने अखेर कारवाई केली गेली चार वर्षे कोर्ट कचेऱ्या सुरू होत्या, तीन वर्षांपूर्वी उच्च न्यायालयाने सदर बार जमीन दोस्त करून त्याचं व्हीडिओ शुटिंग सादर करण्याचे आदेश देऊन ही केडीएमसी प्रशासन चालढकल करीत होती कारण या बार मालक व परिसरात एका मोठ्या राजकीय नेते मालकीचा व अधिकृत आहे सदर जागेचा मालक चेतन शेठ असून गेली काही वर्षे कोर्टात प्रकरण सुरू होते, तसेच कोर्टाचा अवमान ही केडीएमसी प्रशासने केल्याची केस कोर्टात सुरू होती. अखेर काल पासून केडीएमसी प्रशासनाने दणक्यात कारवाई सुरू करून तो वादग्रस्त परिसर जमीन दोस्त करण्यासाठी सुरू केली प्रभाग ग, फ आणि एच प्रभाग क्षेत्रधिकारी प्रचंड पोलीस बंदोबस्त घेऊन कारवाई केली.

### विष्णुनगर शाळेला दोन रजत, एक कांस्यपदक

**डोंबिवली :** राष्ट्रीय शिक्षण संस्था संचालित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर विष्णुनगर शाळेतील इ. ६ वीतील ३ विद्यार्थी बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे आयोजित डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षांमध्ये पदकांचे मानकरी ठरलेले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षिका सुजाता औटी, प्रणिता धानके यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका भावना प्रकाश राठोड यांनी कौतुक केले. राष्ट्रीय शिक्षण संस्था अध्यक्ष कार्यवाह व सदस्य तसेच शाळा समिती अध्यक्ष व सदस्यांनी सर्व पालकांचे विद्यार्थ्यांचे, आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देखील देण्यात आल्या.

### बुधवारी ठाण्यातील काही भागात पाणी नाही

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मानकोली एम.बी.आर. येथे मुख्यजलवाहिनीस गळती होत असून गळती बंद करणे आवश्यक आहे. तसेच स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पिसे ते टेमघर जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत नळ जोडण्या खंडीत करण्यासाठी बुधवार दि. ०९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत शटडाऊन घेऊन सदरची कामे करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. यासाठी महापालिका स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेचा व मे. स्टेम प्राधिकरणाच्या योजनेचा १२ तासाचा शटडाऊन घेवून तातडीची कामे हाती घेणार आहे. परिणामी बुधवार दि. ०९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत घोडबंदर रोड, लोकमान्यनगर, वर्तकनगर, साकेत, ऋतुपार्क, जेल, गांधीनगर, रुस्तमजी, सिध्दांचल, इंदिरानगर, रुपादेवी श्रीनगर, समतानगर, सिध्देश्वर, ईटरनिटी, जॉन्सन, मुंब्रा व कळवाचा काही भाग इत्यादी भागात १२ तासांसाठी पुर्णपणे पाणी पुरवठा बंद राहील. ठाणे महानगरपालिकेमार्फत सदर पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

### पक्षांसाठी विद्यार्थ्यांनी ठेवले दाणा-पाणी



**कल्याण :** वाटीत एवढेसे पाणी भरून ठेवा, पक्षी दिशा दिशांना फिरतील ते थव्यानी सुटतील कंठ त्यांचे मग शोधतील पाणी पाणी, त्यांच्या करीता एवढेच करा वाटीत पाणी भरून ठेवा या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद शाळा चिरड केंद्र करवले, येथे उपक्रमशील शिक्षिका छाया शिदे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात व झाडांवर पक्षांसाठी खाणावळ सुरू केली. दररोज पक्षांसाठी मुठभर दाणे आणण्याचे आश्वासन दिले. मुलांमध्ये पशुपक्षी याबदल दया निर्माण करणे व सामाजिक बांधिलकी रूजवण्याचा प्रयत्न छाया शिंदे व विजय पाटील दोन वर्षांपासून करत आहेत. त्यांचे तिसरे वर्ष असून हा उपक्रम करण्याचा प्रयत्न सर्वांनी मिळून आवडीचा शनिवार या सत्रांत केला.

# 'ठाणे शहर क्षयरोगमुक्त'साठी शिबिराचे आयोजन करावे

## क्षयरोग मूल्यांकनात ठाणे शहर चौथ्या क्रमांकावर

◆ **ठाणे ( प्रतिनिधी) :**

क्षयरोग निर्मुलनासाठी ठाणे महापालिका करीत असलेल्या प्रयत्नांमुळेच ठाणे महापालिका राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे, ठाणे शहर १०० टक्के क्षयरोग मुक्त करण्यासाठी प्रभागसमिती निहाय नागरिकांची काटेकोरपणे तपासणी करावी, यासाठी क्षयरोग विभागाला अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी प्रशासनाला दिल्या. क्षयरोग मुक्त मूल्यांकनात ठाणे शहर चौथ्या क्रमांकावर असल्याबाबत खासदारांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह क्षयरोग विभागातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे अभिनंदन केले. राष्ट्रीय दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, क्षयरोग विभाग गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन आज कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित केले होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. राकेश बारोट, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितिल, क्षयरोगतज्ज्ञ व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांच्यासह आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

क्षयरोग निर्मूलनासाठी ठाणे महापालिकेच्या क्षयरोग विभागाचे सर्व डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचारी हे आपला जीव धोक्यात घालून आत्मीयतेने काम करीत आहेत. महापालिका दफ्तरी नोंद असलेल्या क्षयरुग्णांच्या घरी भेटी देऊन उपचाराबाबत मार्गदर्शन करीत आहेत.

या सर्वांच्याच प्रयत्नांमुळे क्षयरोगाबाबत राज्यशासनाकडून करण्यात आलेल्या मूल्यांकनात विविध महानगरपालिका आणि जिल्ह्यांतील क्षयरोग विभागांमध्ये ठाणे महापालिकेने चौथा क्रमांक प्राप्त केल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांनी क्षयरोग विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर क्षयरोग विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासनाकडून मानधन मिळत असते, पण हे कर्मचारी जीव धोक्यात घालून काम करीत असल्यामुळे त्यांना अतिरिक्त १५ हजार मानधन देणारी ठाणे ही देशातील एकमेव महापालिका असल्याचे यावेळी नमूद केले. क्षयरोग अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांचा यावेळेस विशेष सन्मान करण्यात आला.



### १ कोटींचा निधी उपलब्ध

ठाणे महापालिकेच्या क्षयरोग विभागास सीएसआर निधीतून १ कोटींचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल महानगर गॅस लिमिटेडचे उपाध्यक्ष आत्मकूर चक्रपाणी व सीएसआरचे मुख्याधिकारी सुशांत राऊत तसेच मिंट कॉर्पोरेशनने सीएसआर निधीतून १.२५ कोटी रुपयांचा निधी दिल्याबद्दल उपमहाव्यवस्थापक इंदरदीप कौर यांचेही खासदार नरेश म्हस्के यांनी आभार मानले. यावेळी क्षयरोग निर्मूलनाची मोहीम प्रभावीपणे राबविणारे क्षयरोगतज्ज्ञ व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात आला, तर क्षयरोग विभागातील सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या निखिल लिंगायत, अशोक बोरोले, संजय पवार, साधना जाधव, स्वप्नाली भालेराव आदींना प्रातिनिधीक स्वरुपात खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते पारितोषिक देवून गौरविण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी क्षयरोग विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत ठाणे शहर १०० टक्के क्षयमुक्त करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील राहील असा विश्वास व्यक्त केला.

## चैत्र नवरात्रोत्सवाच्या महाभंडाऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सपत्नीक रमले

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

चैत्र नवरात्र उत्सवात राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी सपत्नीत नवकुंडात्मक सहस्त्रचंडी यागमध्ये सहभाग घेऊन राज्यातील जनतेला सुखी ठेवण्याची मागणी देवीकडे केली. यावेळी श्री अंबे मातेचा जयघोष आणि महाआरती करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आदीसह अनेक मान्यवर नेते आवर्जून उपस्थित होते.

दरम्यान, रविवारी राम नवमी असल्याने देवीच्या जागरातही राम नामाचा जल्लोष सुरू होता. ठाणे, पूर्व, कोपरी, येथील संत तुकाराम महाराज मैदानात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने दरवर्षी धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने श्री अंबे माँ चैत्र नवरात्रोत्सव साजरा केला जातो. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तसेच, नऊ दिवस त्यांच्या कुटुंबीयांनी श्रींची प्राणप्रतिष्ठा, नवकुंडात्मक सहस्त्रचंडी याग व महाआरती करून नवमीच्या दिवशी हजारो भक्तांना महाप्रसादाचे वाटप केले. त्यानंतर उभयतांनी १०८ प्रदक्षिणा घालून श्री माँ अंबेची आराधना केली.

## नद्यांतील प्रदूषणाकडे लक्ष्य देणे महत्वाचे



**विनायक बेटावदकर**
कल्याण

कल्याण शहराला तीन बाजूंनी पाणी आहे. हे पाणी सध्या अनेक कारणांनी प्रदूषित होत आहे. त्याच्या परिणामी कल्याण डोंबिवली तसेच परिसरातील कल्याण ग्रामीण भागात आरोग्याच्या निरनिराळ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. यात उल्हास नदी ही सर्वात मोठी नदी आहे. तिच्यामुळे ग्रामीण भागासह अनेक शहरांच्याही पाण्याचा प्रश्न सुटण्यास सहाय्य झाले आहे. आज उल्हास नदीचे पाणी अधिक प्रदूषित झाल्याचे सांगितले जाते. उल्हासनगरच्या बरोबरच अंबरनाथ, कल्याण जवळील वालधुनी नदी आहे. या दोन्ही नद्यांना विपुल पाणी असूनही ते प्रदूषित झाल्याने पाणीपुरवठ्याच्या समस्येला नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. या नद्यात काही वर्षापूर्वी मासेमारीचा व्यवसाय चाले. कल्याणच्या खाडीत इतके मासे मिळत की येथे कोळी समाजाची स्वतंत्र वसाहत आहे. कल्याणात स्वतंत्र मच्छीमार्केटही आहे. पण अलीकडे या नद्यांचे, खाडीचे पाणी प्रदूषित झाल्याने त्यातील मासे नष्ट झाले. पाण्यात रसायने मिसळल्याने पाणी दुषित झाले. त्यातून पाण्यापासून निरनिराळे आजार सुरू झाले. या नद्यांचे पाणी शुद्ध करण्यासाठी शासनाकडून पाहिजे तसे प्रयत्न होत नसल्याचे, आरोप करीत आम्ही कल्याणकर संस्थेच्या कार्यकर्त्यांनी नद्यांच्या पात्रात बसून उपोषणं केले होते. कल्याणचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी जलशुद्धीकरण प्रश्नात लक्ष घालण्याचे त्यांना आश्वासन दिल्यावर तूर्त ते मागे घेण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

कल्याण शहराच्या पश्चिमेला शहाड, मोहने, अशी गावे आहेत. पूर्वी या भागात नेशनल रेयोन, आयडीआय, अमरडाय, पिग्मनडाय असे अनेक कारखाने होते, शिवाय डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अनेक छोटे उद्योग आहेत, त्यातील काही उद्योगातील सांडपाणी हे कोणतीही प्रक्रिया न करता उघड्या गटारातून नद्यात, खाडीत सोडले जात असल्याच्या तक्रारी होत्या, आजही आहेत, मध्यंतरीच्या काळात साधारण ५०-६० वर्षांपूर्वी शहाड परिसरात उघड्या गटारातील विषारीवायू शहाड आंबिवली, मोहने परिसरात पसरल्याने अनेक जनावरे, पक्षी (कावळे, चिमण्या, कोंबड्या, उंदीर, कुत्री,) मरण पावली, माणसाना विषारी वायूचा त्रास झाल्याने रुग्णालयात दाखल व्हावे लागले ही घटना अनेकांच्या स्मरणात असेल.

हे सर्व लक्षात घेऊन आता उल्हासनदी, वालधुनी नद्यांच्या प्रदूषणंमुक्तीसाठी विशेष कृती आराखडा तयार आहे. या संबंधात आयोजित केलेल्या बैठकीला या भागाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे खास उपस्थित होते. नद्यांच्या पाण्यात जलपर्णी (वनस्पती) मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. ती काढणे, तिची वाढ रोखणे हे महत्त्वाचे आहे, या बरोबरच आजूबाजूच्या छोट्या उद्योगांकडून उघड्या गटारातून रासायनिक सांडपाणी सोडले जाते त्याचाही नागरी आरोग्यावर मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येते. प्रदूषणं नियंत्रण मंडळाने या गोष्टींकडे लक्ष देण्याची आज गरज आहे. कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ मध्ये पूर्वी उद्योगातील सांडपाणी खाडीत सोडण्यापूर्वी प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा होती तीचे आज काय झाले.? ती आज कार्यक्षम दिसत नाही हे सर्व आता कृती आराखड्याच्या निमित्ताने लक्षात घेऊन जलप्रदूषणाकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

## रायते पुलाजवळील उल्हास नदीत ३२ वर्षीय तरुण बुडाला

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण ग्रामीणमधील रायते पुलाजवळ एक ३२ वर्षीय तरुण रविवारी उल्हास नदीत बुडल्याची दुर्दैवी घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रायते येथे राहणाऱ्या सुवर्णा खंडागळे यांच्याकडे विधी कार्यक्रमानिमित्ताने नेवासा तालुक्यातील सरवडी गावातील भाऊ भाऊसाहेब नानासाहेब बारस्कर वय ३२ वर्षे आला होता. रविवारी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास बहिणी बरोबर रायते पुलाजवळ कपडे धुण्यासाठी गेला असता. उल्हास नदी काठाजवळ पाय घसरल्याने तो नदीपत्रातील पाण्यात पडला. आणि खोल पाणी आणि अंदाज न आल्याने नदीच्या पाण्यात बुडला.

या घटनेची टिटवाळा पोलिसांनी दखल घेत पीएसआय प्रशांत जाधव यांनी घटनास्थळी पोहचत टिटवाळा अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने शोध कार्य सुरू केले. दोन अडीच तासांच्या शोध मोहीमेत पुलाच्या नदीच्या पाण्यात बुडालेल्या भाऊसाहेबचा देह अग्निशमन दलाच्या जवानांच्या हाती लागला. देहाला अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले आणि रुग्णालयातील डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## बसमधून संकटसमयी बाहेर पडण्याचा मार्ग बंद

### परिवहन बसच्या मागील बाजूला काचेऐवजी प्लायवूड

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महापालिका परिवहन सेवेच्या बसला मागील बाजूला काचे ऐवजी प्लायवूड लावले असल्याने संकटसमयी बाहेर पडण्याचा मार्गच बंद झाला आहे त्यामुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली आहे. तसेच वाहतूक नियमाचे उल्लंघन सुद्धा होत आहे. मीरा-भाईंदर महापालिकेची स्वतंत्र परिवहन सेवा असून प्रवाशांच्या सेवेसाठी ७४ बसचा ताफा तसेच ३२ इलेक्ट्रिक बससुद्धा असून त्या सर्व १८ बस मार्गावर धावतात त्यातून दररोज १ लाख प्रवासी प्रवास करत आहेत. अशी उत्कृष्ट सेवा ठाणे जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यातील महापालिकेत कौतुकास्पद म्हणून ओळखली जात आहे; परंतु अलीकडे





वाहनांत वारंवार तांत्रिक बिघाड अधिक आढळून येत आहे.

शहरातील सामाजिक कार्यकर्ते सचिन जांभळे यांना शनिवार ५ एप्रिल रोजी बस क्र. एम. एच.०४ इ.पी. ०६४० तसेच बस मार्ग क्र. २४ या बसमधून प्रवास करताना आढळून आले की, बसची मागील काच पूर्णपणे तुटल्यामुळे त्या जागेवर काच न लावता प्लायवूड लावून ती जागा पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. ती काच बस चालकाला मागून येणाऱ्या वाहनाचे संकेत समोरील व दोन्ही बाजूला असलेल्या आरशात दिसत असतात. तसेच ती काच म्हणजे संकट परिस्थितीत सुखरूपपणे बाहेर पडण्याचा मार्ग असतो. तसा संदेश त्या काचेवर सुद्धा लिहिलेला असतो. तीच जागा प्लायवूड लाऊन बंद केल्यामुळे प्रवाशांचा संकटसमयी बाहेर पडण्याचा मार्ग बंद झाल्याने त्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. याबाबत सचिन जांभळे यांनी महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांना तक्रारीचे निवेदन दिले आहे.

## साई श्रद्धा सेवा संस्थेच्या वतीने मान्यवरांना 'डोंबिवली सन्मान'

**कल्याण :** साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्था, डोंबिवली यांच्या वतीने श्रीराम नवमी २०२५ निमित्ताने आयोजित करण्यात आलेला पंधरावा वार्षिक उत्सव अत्यंत उत्साही आणि भाविकांच्या सहभागाने पार पडला. यानिमित्त साईबाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक, साईबाबांचे दर्शन सोहळा तसेच साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमात सर्व महिलांना हळदीकुंकू वाटप करून गुलाब पुष्प देण्यात आले. यावेळी पंचवीस महिला बचत गटांच्या सदस्या आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. तसेच अनेकांनी साई महाप्रसादाचा लाभ घेतला.

## सात रस्ता येथे २१० निरंकारी भक्तांचे उत्साहपूर्ण रक्तदान

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको' या उदात्त भावनेतून संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या वतीने रविवारी मुंबई पब्लिक स्कूल, शांतीनगर, सातरस्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २१० निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले.

संत निरंकारी रक्तपेढी, विले पार्लेमार्फत रक्त संकलन करण्यात आले. निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षा जी यांचे कथन आहे, की जीवन तेव्हाच महत्त्वपूर्ण ठरते जेव्हा ते इतरांसाठी जगले जाते. हीच शिकवण





धारण करून निरंकारी भक्त निष्काम भावनेने निरंतर मानवतेच्या सेवेमध्ये आपले योगदान देत असतात. संत निरंकारी मिशनच्या डिलाईल रोड आणि लोअर परळ ब्रांचच्या रक्तदात्यांनी या शिबिरामध्ये अत्यंत उत्साहाने भाग घेत जवळपास २७० रक्तदात्यांनी रक्तदानासाठी आपली नावे नोंदविली होती.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संत निरंकारी मंडळाच्या डिलाईल रोड विभागाचे संयोजक गोपीनाथ बामुगडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संत निरंकारी मासिकाचे संपादक चंद्रकांत जाधव यांच्यासह अनेक प्रबंधक व सेवादल अधिकारी उपस्थित होते. दोन्ही ब्रांचचे सेवादल युनिट आणि मुखी अनंत घानकुटकर यांनी हे शिबीर यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## टिटवाळ्यामध्ये बेसिक इलेक्ट्रॉनिक्स वर्कशॉप साजरे

**कल्याण :** द सायन्स पॉईंट ॲक्टिव्हिटी अड्डा, टिटवाळा आणि द यंग सायंटिस्ट बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने बेसिक इलेक्ट्रॉनिक्स वर्कशॉप संपन्न झाले. बीएएसएफ सारख्या आंतरराष्ट्रीय केमिकल कंपनीत रीसर्च सायंटिस्ट म्हणून निवृत्त झालेले आणि कुतूहल एंटरप्राइजचे विलास वखारे यांनी अतिशय सोप्या आणि समर्पक शब्दांत मुलांना नवीन आणि तितकाच किचकट वाटणारा इलेक्ट्रॉनिक्स सारखा विषय समजावून सांगितला. सध्याचे युग हे डिजिटल असल्याने दिवसांगणिक टेक्नॉलॉजीत सुधारणा होत आहेत. नवनवीन टेक्नॉलॉजीची माहिती असणे आवश्यक झाले.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी जोपासतात पर्यावरण संवर्धन

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

बावघर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी परिसरातील झाडांना पाणी टाकून त्यांना नवसंजीवनी देऊन पर्यावरण संवर्धन जोपासण्याचा प्रयत्न करीत आहेत. शहापूर तालुक्यातील वासिंदपासून जवळपास दहा ते बारा किमी अंतरावर असलेल्या बावघर या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षिका हर्षला गोष्टे यांच्या संकल्पनेतून येथील रखरखत्या उन्हात पाण्याची नितांत आवश्यकता असणाऱ्या झाडांचा शोध घेत आणि त्या झाडांना दैनंदिन पाणी टाकून झाडांना नव्याने उभारी घेण्यास मदत केली असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक सचिन ढमणे यांनी सांगितले.

यामध्ये वड, पिंपळ, डीकामाळी, आंबा, पेरू यासारखी झाडे शोधून गावातून पाणी आणून या झाडांना पाणी घातले जाते. त्यामुळे आवश्यक असलेल्या झाडांना पाणी टाकून त्यांना नवसंजीवनी देऊन पर्यावरण संवर्धन जोपासण्याचा प्रयत्न शाळेतील शिक्षक व विद्यार्थी करीत आहेत. सदरचा उपक्रम पर्यावरण संवर्धनास आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयी आपुलकी बाळगण्यास निश्चितच मदत करेल.

वन विभागाकडून ३० आधुनिक ट्रॅप कॅमेरे बसवले जाणार

# येऊरच्या जंगलात तिसऱ्या डोळ्याची करडी नजर !

**प्रशांत सिनकर**

**ठाणे :** निसर्गातील जैवसाखळी कुठे तरी अप्रत्यक्षपणे नष्ट करण्याचे काम माणसांकडून होत असून, जंगलतोड वन्य जीवांची शिकार अशा घटना सातत्याने होत आहेत. मात्र याला काहीसा लगाम घालण्यासाठी वन विभागाने पावले उचलली आहेत. येऊरमधील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वन विभाग ३० आधुनिक ट्रॅप कॅमेरे बसवणार असून, जंगलात कोणते वन्यप्राणी आहेत याची माहिती समजणार आहे. परंतु या बरोबर जंगलातील अवैध हालचालींवर नजर ठेण्यासाठी कॅमेरे मदतगार ठरणार आहेत. ठाणे आणि मुंबई शहराचे हृदय म्हणून संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ओळखले जात. साधारण १० हजार स्क्वेअर किमी परिसर असणाऱ्या राष्ट्रीय उद्यानाचा साठ टक्के भाग हा वन विभागाच्या येऊर रेंजमध्ये मोडतो.

वाढत्या अतिक्रमणामुळे जंगलातील जैव सृष्टीच धोक्यात आली आहे. वन विभाग जंगलातील वन्यजीव आणि वन संपदेचा सुरक्षा करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत असताना, आता मदतीसाठी कॅमेराचा तिसरा डोळा नजर ठेवून असणार आहे. विभागाचे उपसंचालक प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली येऊर रेंजमधील महत्त्वाच्या ३० ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसवले जाणार आहेत. जंगलात बिबटे, माकड, हरण, मुंगूस, रानमांजर, रान डुक्कर असे साधारण ४० प्रकारचे वन्यजीव आढळून येतात. या वन्य जीवांबरोबर जंगलाची देखभाल करण्याची मोठी जबाबदारी वन विभागाकडे आहे. त्यामुळे जंगलाची सुरक्षा अधिक भक्कम होण्याच्या दृष्टीने मोक्याच्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसवले जाणार आहेत. त्यामुळे ट्रॅप कॅमेऱ्यांची ही योजना जंगलाच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.



> ट्रॅप कॅमेरे दिवसाबरोबर तितक्याच कुशलतेने रात्री देखील काम करणार आहेत. ट्रॅप कॅमेरामधून कोणकोणती वन्यप्राणी पक्षी संपदा आपल्या इथे आढळते याचीही माहिती मिळेल. तसेच जंगलात अनधिकृत फिरणाऱ्या व्यक्ती अथवा गुन्हेगार यांच्याकडे देखील लक्ष ठेवण्यासाठी कॅमेरे उपयुक्त ठरतील.
>
> **- मयूर सुरवसे** (वन परिक्षेत्र अधिकारी, येऊर )

## 'विरंगुळा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

ज्येष्ठ कवी रामचंद्र परब यांच्या 'विरंगुळा' या दुसऱ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ५ एप्रिल रोजी माटुंगा सांस्कृतिक केंद्र येथे एका विशेष कार्यक्रमात करण्यात आले. याप्रसंगी विचारमंचावर राज्याचे माजी गृह राज्य मंत्री बाळा नांदगावकर, सिनेदिग्दर्शक, लेखक केदार शिंदे, राज्याचे माजी मोटार वाहन विभाग आयुक्त डी. जी. जाधव, लेखक-पत्रकार राजेंद्र घरत उपस्थित होते. आपण गेली अनेक वर्षे परब यांना ओळखत असून त्यांनी विविध विषयांवर कविता केल्या आहेत. विषयांचे वेगळेपण दर्शवणे, सर्वसामान्यांना भावणाऱ्या कविता लिहीणे ही त्यांची आवड असून त्यांनी याहीपुढे काव्यलेखनात सातत्य ठेवावे अशा शब्दात नांदगावकर यांनी कवीवर्यांना शुभेच्छा दिल्या. आपण लेखक, नाटककार झालो; कवी होणे काही जमले नाही असे आपल्या मनोगतात केदार शिंदे म्हणाले व कवितांमधील वैविध्यांबद्दल त्यांनी परब यांचे कौतुक केले.

लेखक-पत्रकार राजेंद्र घरत यांनी कवी परब यांच्या अनेक कविता, पत्र, लेख आपण संपादित करत असलेल्या अंकांमधून प्रसिध्द केल्याच्या स्मृती आपल्या भाषणातून यावेळी जागवल्या व पराकोटीचा साधेपणा; निष्पाप, निरागस वागणे व प्रसंगी पसरट वाटले तरी अगत्याचे, विनम्र बोलणे व तन्मयतेने लिहीणे याचे आपणास आकर्षण असल्याची भावना मांडली. कवी परब यांनी ज्या राज्य मोटार वाहन विभागात काम केले तेथील माजी आयुक्त डी. जी. जाधव यांनी कवी परब ही तरल, कवीमनाची व्यवती आमच्यासारख्या रुक्ष-व्यवहारी विभागात काम करण्यास 'अनफिट' असल्याचे मजेशीर निरीक्षण नोंदवत त्यांनी नोकरीत असताना व आताही जे संवेदनशील मन, तरल वृत्ती जोपासली आहे. परब यांना पुढील लिखाणासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन परब कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांभुळी गावचे अनेक हितचिंतक तसेच मुंबईत माझगाव येथे त्यांच्या वास्तव्यात जोडलेले शेजारी, परिवहन विभागातील नोकरीतील सहकारी, ठाणे, मुंबई-नवी मुंबई, पनवेल परिसरातून आलेले श्रोते उपस्थित होते.

## अमेरिका असंतोषानंतर ट्रम्प भूमिका बदलतील का?

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफविरोधात आज अमेरिकेत हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी ट्रम्प यांच्याशिवाय एलॉन मस्क यांच्याविरोधातही घोषणा दिल्या. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाचा संताप आंदोलकांच्या घोषणांतून व्यक्त होत होता आणि ट्रम्प यांनी लागू केलेल्या नव्या दरवाढीमुळे जगभरातील स्टॉक मार्केट आज अक्षरशः कोसळले. सकाळी सुरुवात झाल्यापासूनच बाजार कोसळण्याचे संकेत मिळाले आणि त्यातून ट्रम्प यांच्या मनमानी धोरणाची झलक पाहायला मिळाली होतीच. आजचे आंदोलन हे ट्रम्प यांच्या प्रशासनाविरोधातील सर्वात मोठे आंदोलन होते हे अनेकांनी नमूद केले आहे आणि हे आंदोलन ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे अमेरिकन लोकांच्या मनातील राग यानिमित्ताने दिसून आला आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे केवळ जास्त कर द्यावे लागतात हा एकमेव मुद्दा नाही, तर हजारो लोकांच्या नोकऱ्या जाऊन ते बेरोजगार होणार आहेत. तसेच त्यांना निवृत्तीनंतर जे लाभ मिळत असतात त्यांना चांगलीच कात्री बसणार आहे. लोकांच्या मनातील राग हा आहे.

अमेरिकेत मध्यमवयीन तसेच वृद्ध नागरिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे निवृत्तीनंतरच्या लाभांना तेथे अत्याधिक महत्त्व आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे अमेरिकन नागरिकांना या लाभांवर पाणी सोडावे लागणार आहे. त्यामुळे लोक रस्त्यावर उतरले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आंदोलनातील लोकांचा राग जसा वाढत आहे तशीच त्यामागील उत्स्फूर्तता वाढत आहे. अर्थात ट्रम्प यांच्यावर याचा परिणाम होणार नाही, कारण त्यांनी असे म्हटले आहे की, काही मिळवायचे असेल तर काही गमवावे लागतेच. अनेक जागतिक नेत्यांनी ट्रम्प यांच्याशी टॅरिफवर बोलणी केली आहेत आणि त्यात जपानचा समावेश आहे तसेच ब्रिटनचा समावेश आहे. पण ट्रम्प त्यांचे ऐकतील असे वाटत नाही, असे तज्ज्ञांना वाटते. ट्रम्प यांच्या धोरणाविरोधात सर्वप्रथम नॅशनल मॉल येथे निदर्शने आयोजित केली गेली आणि ती लाट हळूहळू सर्व जगभर पसरत आहे. इतर अनेक शहरांमध्ये असेच गट आंदोलन करत आहेत आणि त्यांचा रोख आहे तो ट्रम्प यांच्यावर. ट्रम्प, मस्क आणि अनेक अब्जाधीश मिळून आम्हाला बरबाद करू पाहत आहेत असा त्यांचा आरोप आहे. त्याला ट्रम्प यांनी काहीही उत्तर दिले नाही. ट्रम्प यांच्या रेसिप्रोकल टॅरिफमुळे जगाला हादरा बसला आहे तरीही भारतावर त्याचा सर्वात कमी परिणाम झाला आहे असे काहींचे म्हणणे आहे. त्याच्या टॅरिफमुळे जगभर शॉकवेव्हज निर्माण झाल्या आहेत हे निश्चित आहे; परंतु जागतिक बाजारपेठा मात्र धक्क्यात आणि गोंधळाच्या स्थितीत आहेत हे लपवून चालणार नाही. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे मुक्त व्यापाराला धक्का बसला असला तरीही त्याचा धक्का अगदीच गंभीर जखमी करणारा नसेल असे काहींनी म्हटले आहे. पण अमेरिकेच्या टॅरिफ वॉरमुळे जागतिक बाजारावर त्याचा विपरित परिणाम होणार आहे हे निश्चित. या टॅरिफ वॉरमुळे फ्री ट्रेडला धक्का बसला असला तरीही त्यामुळे मोठे गुंतवणूकदार खासगी इक्विटी विकून टाकण्याचा विचार करत आहेत, हे कोणत्याही बाजाराला धोकादायक आहे. सर्व जगभरात ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे लोक रस्त्यावर आले आहेत आणि त्यांना चिंता आहे ती आपल्या भवितव्याची.

जागतिक बाजारपेठांमध्ये ट्रम्प यांच्या शुल्कामुळे प्रचंड आर्थिक उलथापालथ झाली आहे आणि त्यामुळे गुंतवणूकदारांना भीती किंवा भावनेने प्रेरित होऊन निर्णय न घेणे हीच आज सर्वात महत्त्वाची बाब बनली आहे. त्याला लोक कसे सामोरे जातात यावर ट्रम्प यांच्या या टॅरिफ योजनेचे यशापयश अवलंबून आहे. आर्थिक बाजारपेठ ही अनिश्चिततांनी भरलेली आहे, त्यामुळे कोणत्याही क्षणी कसलाही आततायी निर्णय न घेता आलेली परिस्थिती स्वीकारून शांतपणे निर्णय घेणे ही आजची जबाबदारी आहे हे ओळखून लोकांनी वागायला हवे. ट्रम्प यांच्या व्यापार करामुळे मुंबई शेअर बाजारात उलथापालथ झाली आहे आणि तेथे शेअर्स कोसळले आहेत, त्यामुळे सेन्सेक्स २६०० अंकांनी कोसळला आणि ही मोठी पडझड आहे. निफ्टीचीही हवालदिल अवस्था झाली आहे आणि त्यामुळे सर्व क्षेत्रांतील गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचा निर्णय एकट्या अमेरिकेपुरता मर्यादित नाही, तर सर्व जगाला त्याचा फटका बसला आहे. ही अत्यंत दयनीय परिस्थिती आहे. यातून अमेरिकेतच नव्हे, तर जगभरात मंदी ओढवणार आहे. या परिस्थितीमुळे जगाला १९२९ च्या जागतिक मंदीची आठवण आली, तर नवल नव्हे. त्यावेळी अमेरिकेत अशीच मंदी आली होती आणि त्यानंतर अमेरिका कोसळली होती. तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष होते हर्बर्ट हूव्हर. त्यांच्या काळात स्टॉक मार्केट कोसळले होते आणि कित्येकांनी आत्महत्या केल्या होत्या. आज एवढी परिस्थिती नसली तरीही अमेरिका आजही तितकीच दयनीय स्थितीत आहे हे या लोकांच्या आंदोलनामुळे सिद्ध झाले आहे. आज अमेरिकन जनता रस्त्यावर आहे आणि त्याचे पडसाद सर्व जगभर उमटत आहेत. आज अमेरिकेत करण्यात आलेली निदर्शने ही सर्वात मोठी होती, असे आता सांगण्यात येत आहे. पण ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे आणखी एक गंभीर परिणाम समोर आला आहे आणि तो म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेला धक्का बसला आहे. त्यामुळे धोक्याचे संकेत मिळाले आहेत. त्यातून जग कसे सावरणार हे आता प्रत्येक देशावर अवलंबून आहे. उद्योगांमध्ये घसरण झाली आणि प्रत्युत्तराच्या धमक्या यांची एक लाट आली आहे. त्यामुळे जगभर एक प्रतिस्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे आणि चीनने अमेरिकेवर गुंडगिरी केल्याचा आरोप केला, तर युरोपियन युनियनने अमेरिकेवर तसेच कर लावण्याची धमकी दिली आहे. व्यापार युद्ध आणि शुल्क युद्धामध्ये कुणीही विजेता नसतो असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते म्हणाले, ते तंतोतंत सत्य आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांनी अमेरिकेला आपला टॅरिफ मागे घेण्याचे आवाहन केले आहे. अर्थात अमेरिका ते मानणार नाही हे सत्य आहे. त्यामुळे या युद्धात फक्त जगच नव्हे तर अमेरिकाही होरपळणार आहे. पण ट्रम्प यांच्यासारख्या हट्टी नेत्याला हे सांगणार कोण अशी परिस्थिती आहे.

# पर्यावरणपूरक प्रकल्प, प्रगती की अधोगती ?

'निसर्गवेद' जोपर्यंत आपल्याला कळत नाही तोपर्यंत आपल्याला या सजीव सृष्टीचे गणित समजणार नाही. यामुळेच या विषयात अनेक वर्षे अध्ययन करून, सृष्टी संशोधक म्हणून मी पीएच. डी. केली आणि याच विषयाच्या आनुषंगाने सरकारला 'पर्यावरणपूरक शहर सौंदर्यीकरण' प्रकल्प दिले. निसर्गवेदाचा अभ्यास करून केलेल्या या प्रकल्परचना सर्व सजीवसृष्टीला सुदृढ करणाऱ्या होत्या.

२०१८-१९ पासून हे प्रकल्प सतत महाराष्ट्र सरकारला देत आहे. आम्ही अध्ययन करून तुम्हाला कळवतो अशी आश्वासन तेव्हापासून देण्यात आली. तेव्हा एक प्रश्न पडला जे अध्ययन करण्यास मला ३५ वर्षे लागली त्याचे अध्ययन इतक्या कमी वेळात हे कसे करतील? परंतु त्यानंतर कोणताही संवाद साधण्यात आला नाही. २०२२ पासून ते प्रकल्प सगळीकडे दिसायला लागले; परंतु त्याच्यात नकारात्मकता जास्त वरचढ होताना दिसत होती. उदाहरणार्थ अजीर्ण, असह्य होतील असे पोल डिझाईन आणि रंगरंगोटी ज्यांनी फक्त भिंती खराब केल्या, नको तेवढ्या पोलवरील लाईटच्या अपघाती गुंडाळ्या (राज साहेब ठाकरेंच्या निरीक्षणानुसार आणि त्यांनी केलेल्या जाहीर टीकेनुसार निव्वळ बियर बार), मन विचलित करणारे भर रस्त्यांवरील डिव्हायडरमधील योगाच्या मूर्त्या, नको त्या ठिकाणी वृक्ष लागवड - या वृक्ष रचनेमुळे अनेक पूल पडणे, रस्ते उखडणे असे अनेक अपघात होणार आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हजारो कोटींची जनतेच्या पैशांची बिनडोक उधळण.

थोडक्यात काय तर कुणाचाच कुणाला मेळ नसणाऱ्या प्रकल्प रचना. मुळातच शहर सौंदर्यीकरण संकल्पना समजली की नाही हा फार मोठा प्रश्न आहे. या प्रकल्पांचा मूळ विषय फक्त हाताळण्यात आला; परंतु अभ्यासला गेला नाही. मुंबईला सुरक्षित करणारे वृक्ष हे मुळातच नैसर्गिकरीत्या येथे होते; परंतु या वृक्षांची छाटणी करून तेथे जे काही बांधकाम आणि प्रकल्प राबवण्यात आले आहेत, ते अतिशय धोकादायक आहेत. जे मुंबई बुडण्यासाठी पूरक आहेत. नैसर्गिक संरचनेला तडा देणाऱ्या या प्रकल्प योजना सर्वच जीवसृष्टीसाठी घातक आहेत. या सर्व सौंदर्यीकरणामध्ये नक्की काय साध्य झाले? रंगरंगोटी, नक्षी काढणे, वृक्ष लागवड करणे म्हणजे सौंदर्यीकरण नव्हे. मुळातच सौंदर्यीकरणाची संकल्पना चुकीची झाली आहे आणि त्याचे परिणाम किती भयंकर होणार आहेत याचा विचारच केला गेला नाही.

एक सृष्टी संशोधक म्हणून एवढंच सांगू इच्छिते की, या प्रगतीच्या नावाखाली केलेल्या अतिरेकामुळे झालेला नैसर्गिक विध्वंस आता मानवी जीवन कसे उद्ध्वस्त



करतो तेच पाहा. हिरव्यागार वनराईची जागा सिमेंटच्या जंगलांनी घेतली. साहजिकच दिवसेंदिवस उष्णता इतकी वाढणार की किती झाडे लावली तरीही ही उष्णता वाढतच राहणार. सुरुवात ही ऋतुमान बदलाने झालीच आहे; परंतु याचे पडसाद हे किती भयावह होतील हे दिवसेंदिवस तुम्हाला दिसतील. अति खोदकामांमुळे, नको त्या प्रकल्पांमुळे कमकुवत झालेल्या जमिनीची नैसर्गिक प्रक्रिया ही पूर्णपणे कमकुवत होणार. प्रदूषणाचा विळखा आहेच. समुद्राच्या भूगर्भात झालेल्या हालचालींमुळे ही जमीन समुद्र कधी गिळंकृत करेल तेही समजणार नाही. शिवाय समुद्रात असणारे अज्ञात जीव या जमिनीवर येतील ते वेगळेच. मुंबई बुडणार हा सर्वात मोठा मुंबईला धोका. पण मुंबई बुडण्यासाठी सध्याच्या प्रकल्प योजना या पूरक आहेत. मुंबईतून बाहेर पडण्यासाठी सुद्धा वाट राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे.



डॉ. महालक्ष्मी वानखेडकर

तुम्हाला सरकारी कामाचा काही अनुभव आहे का आणि नसेल तर आम्ही तुम्हाला प्रकल्प देऊ शकत नाही. ३ वर्षे तुम्हाला दुसऱ्यांच्या हाताखाली काम करावे लागेल तरच तुम्हाला प्रकल्प देऊ शकतो. याचा नक्की अर्थ काय? आज एक सृष्टी संशोधक असताना सुद्धा हे कर्णमधुर स्वर सरकारी कार्यालयात कानी पडले आहेत. दुर्दैव म्हणजे आमच्यासारख्या सृष्टी संशोधक आणि तज्ज्ञ यांच्या गुणवत्तेला या सरकारी प्रशासनामध्ये काही महत्त्व नाही का? सरकारी अधिकाऱ्यांसमोर आलेला प्रस्ताव बारकाईने तपासून अमलात आणणार नाहीत का? यामुळे खासगी संस्थांना सुद्धा या विकासकामात जर भाग घ्यायचा असेल तर अडथळे निर्माण होतात. योजना मांडणाऱ्यांना फक्त पायऱ्या झिजवाव्या लागतात. मंत्री महोदयांनी सांगून सुद्धा सरकारी अधिकारी त्यात लक्ष घालत नाहीत. हा अनुभव अनेकांना येतो त्यामुळे खासगी क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना नवीन कार्य करून दाखवण्याची संधी मिळतच नाही. कार्यालयातील या फाईली पुढे सरकतच नाहीत. असे अनुभव मला स्वतःला पदोपदी आले आहेत. सर्व प्रकल्प, योजना या सरकारी कार्यालयात ठेवल्या जातात; परंतु अमलात आणताना त्यावर कोणत्याही प्रकल्प रचनाकाराचे मार्गदर्शन घेतले जात नाही किंवा संवाद साधला जात नाही. असा अनुभव आमच्यासारख्या कलावंत, तज्ज्ञ, अभ्यासकांना आणि प्रकल्प रचनाकारांना येतो त्यामुळे आमच्या पदरी नैराश्य येते.

आज आमच्या देशात जर सृष्टी संशोधक शास्त्रज्ञांना हा अत्यंत वाईट अनुभव येत असेल, तर आमच्या ज्ञानाचा आमच्या देशासाठी काय उपयोग? आज नक्की प्रगती कोणत्या दिशेने करायची यासाठी तज्ज्ञ नेमण्याची अत्यंत गरज आहे. सरकारमध्ये अनेक चांगले लोक असताना सुद्धा ते का लक्ष देत नाहीत असा प्रश्न आम्हाला पडतो. जर सरकारी यंत्रणेत अशी नोकरशाही असेल तर आमच्यासारख्या तज्ज्ञांनी या प्रगती प्रकल्पात भाग घ्यावा का? यातून सरकार काही बोध घेणार आहेत का? हे जर असेच चालत राहिले तर सजीव सृष्टीतील सर्व घटकांना याचे परिणाम भोगावेच लागतील.

dr.mahalaxmiwankhedkar@gmail.com

# साईज कंट्रोल ॲण्ड टूल्स प्रायव्हेट लिमिटेड

सेवाव्रती



शिबानी जोशी

आपण गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून मेक इन इंडिया, स्किलिंग इंडिया, स्टार्टअप इंडिया हे शब्द ऐकत आहोत; परंतु जवळजवळ ४८ वर्षांपूर्वी अशोक दुर्वे यांनी नोकरी सोडून स्वतःचा उद्योग व्यवसाय करायचे ठरवले आणि हातात केवळ पाच लाख रुपये असताना स्वतःकडे अनुभव आणि शिक्षण असलेल्या स्किल्सच्या आधारे उद्योग उभारायचं ठरवलं. त्या काळात हे खरोखरंच शिवधनुष्य पेरण्यासारखं होतं; परंतु स्वतःमधील स्किल्स, आत्मविश्वास यावर ठाम विश्वास असल्यामुळे अशोक दुर्वे यांनी हे धाडसी पाऊल उचललं.

पन्नास-साठ वर्षांपूर्वी आपल्या देशातील शिक्षणाची द्वारं आपल्याला माहितीच आहेत. त्या काळात इंजिनीयरिंग शिक्षण घेतलेले अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतके असत. अशोक दुर्वे यांनी इंजिनीअरिंगमधला डिप्लोमा केला होता आणि शिकत असताना त्यांना एका विदेशी कंपनीमध्ये नोकरी लागली. त्या कंपनीमध्ये उत्पादनाचा प्रशिक्षण आणि अनुभव त्यांनी घेतला. त्यानंतर अशाच आणखी दोन-तीन आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये चांगल्या लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या त्यांनी केल्या.

गॅजेट म्हणजेच किंवा एखादा थ्रेड स्वरूप वस्तू कोणत्याही इंजिन किंवा वाहनांमध्ये अतिशय फिट्ट बसवण्याची गरज असते. त्यासाठी अचूक अशा गॅजेट्सच उत्पादन आपल्या भारतात होतच नव्हतं. काही युरोपमधल्या देशांमध्ये याचे उत्पादन होत असे आणि हे बनवण्यासाठीची यंत्र आजही भारतात उपलब्ध नाहीत. ती युरोपमधून आयातच करावी लागतात. अल्फा लावेल सारख्या कंपन्यांमध्ये बारा एक वर्षांचा कामाचा अनुभव घेतल्यानंतर अशोक दुर्वे यांच्या लक्षात आलं की, आपणही अशा प्रकारचं काम स्वतः हाती घेतलं तर आपण देशांतर्गत मागणी पुरवू शकतो तसेच निर्यातही करू शकतो. अशोक दुर्वे यांनी जेव्हा कारखाना उभारायचं ठरवलं तेव्हा पुण्यात तर खूपच महाग जागा होत्या. अहमदनगरमधील एमआयडीसीमध्ये त्यांना एक जागा कळली. त्यानी कर्जासाठी ॲप्लीकेशन



अशोक दुर्वे

केले आणि त्यांचं एकूणच प्रपोजल आणि उत्पादनाचं वेगळं स्वरूप पाहून त्यांना कर्ज उपलब्ध झालं. स्वतःचे पाच लाख आणि ४५ लाख रुपयांचं कर्ज घेऊन त्यांनी त्याचे उत्पादन सुरू केले. सुरुवातीला त्यांच्याकडे केवळ आठ ते दहा कामगार होते. त्यांना अचूकतेच शिक्षण देणंही गरजेचं होतं. अशोक दुर्वे यांचं कुटुंब पुण्यात राहात होतं आणि सुरुवातीची जवळजवळ चार वर्षे ते मात्र अहमदनगर येथे वास्तव्याला जाऊन राहिले. चांगल्या प्रतिष्ठित कंपन्यातील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून स्वतःचा उद्योग स्थापन करण्याच धारिष्ट अशोक दुर्वे यांनी दाखवलं अर्थात त्यामध्ये आणखी एक कारण होतं ते म्हणजे घरच्यांची बहुमोल साथ. त्यांच्या सुविद्य पत्नीने त्यांच्या स्वप्नांसाठी त्यांना संपूर्ण साथ दिली. घराची, मुलांची जबाबदारी स्वीकारली. हळूहळू कामाचा दर्जा, गुणवत्ता पाहून त्यांना मोठमोठ्या कंपन्यांच्या ऑर्डर्स मिळू लागल्या. भारतातील प्रतिष्ठित ऑटोमोबाईल कंपन्या, महिंद्रा, हिरो होंडा, टाटा, विप्रो, अशोक लेलँड, गोदरेज, एस्कॉर्टस, भारत डायनामिक्स, इस्रो यांसारख्या संस्थाना ते उत्पादन पुरवतात. आज जवळजवळ त्यांचा ६० टक्के मालाची निर्यात होते. युरोप, सिंगापूर,आफ्रिका खंडात एकूण १७ देशांमध्ये त्यांची उत्पादनं पोहोचत आहेत. अशा तऱ्हेने एका प्रकारे ते देशाच्या निर्यातीमध्ये सुद्धा हातभार लावत आहेत आणि राष्ट्रीय विकासातही सहभागी होत आहेत असं आपल्याला म्हणता येईल. कारण या क्षेत्रात उत्पादन करणारी कदाचित त्यांची एकमेव भारतीय कंपनी असावी.

अशोक दुर्वे यांनी बाथ, यूके येथील हॉर्मन गियर कंपनी येथे गेज उत्पादन आणि डिझाइनिंग प्रशिक्षण घेतले आणि गेज उत्पादनाचा अनुभव घेतला. आज त्यांची कंपनी SO ९००१ प्रमाणित कंपनी आहे आणि API ५-B आणि API ७-२ मानकांनुसार गेजेसच्यासाठी अमेरिकन पेट्रोल इन्स्टिट्यूटची मान्यता त्यांना आहे. साईज कंट्रोल अँड टूल्स प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी नेमकं काय बनवते. 'API' मोनोग्राम वापरण्याची परवानगी त्यांना आहे. अशोक दुर्वे यांचे दोन्ही सुपुत्र अतुल आणि अमित तसंच आता त्यांचा नातू आकाशही या व्यवसायात उतरला आहे. त्यांनी ही इंजिनीयरिंग शिक्षण पूर्ण केलं आहे. हे खूप अनकॉमन असे उत्पादन ते बनवतात. अशाच प्रकारच्या अनकॉमन उद्योगात युवकानी पुढे यावं तर त्यांना भरपूर यश मिळेल अर्थात आपण उत्पादित करणार आहोत, त्याची संपूर्ण माहिती आपल्याला हवी असं अशोक दुर्वे तरुणांना आवर्जून सांगतात.

दुर्वे यांनी सुरुवात केली तेव्हा इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग त्यानंतर आलेलं इलेक्ट्रॉनिक्स आणि आता तर एआयचा वापरही ते उत्पादन घेण्यासाठी करत असतात. काळाप्रमाणे तंत्रज्ञान बदलत आहे, त्याचा वापर आपण आपल्या उद्योगात करून अद्ययावत राहिलं पाहिजे असं दुर्वे सांगतात. त्यांच्या क्षेत्रात येणाऱ्या नव्या कल्पनांना घेऊन अजूनही नवनवीन उत्पादन घेण्याची आकांक्षा ते बाळगून आहेत. हेच खरं तर यशस्वी उद्योजकाचं गमक असतं असं म्हणायला हरकत नाही.

joshishibani@yahoo. com

## राशिभविष्य

मंगळवार, ०८ एप्रिल २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती चैत्र शुद्ध सप्तमी शके १९४७. चंद्र नक्षत्र आर्द्रा. योग शोभन. चंद्र राशी मिथुन भारतीय सौर १८ चैत्र शके १९४७ मंगळवार, दिनांक ८ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.२७, मुंबईचा चंद्रोदय ११.२४, मुंबईचा सूर्यास्त ६.५४, मुंबईचा चंद्रास्त १.११ उद्याची. राहू काळ ११.०७ ते १२.४०. कामदा एकादशी, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष** : अनपेक्षित चांगल्या घटना घडतील.

**वृषभ** : आर्थिक भरभराट होईल.

**मिथुन** : चांगली प्रगती करू शकाल.

**कर्क** : कायदेविषयक प्रश्न सुटतील.

**सिंह** : वैवाहिक जीवनातून सुवार्ता मिळतील.

**कन्या** : नोकरीमध्ये पदोन्नती मिळू शकते.

**तूळ** : स्वप्ने साकार होतील.

**वृश्चिक** : व्यवसायात सर्वसामान्य परिस्थिती राहील.

**धनू** : स्पर्धात्मक यश अनुभवता येईल.

**मकर** : अपेक्षित सहकार्य मिळेल.

**कुंभ** : नोकरीविषयक प्रश्न सुटतील.

**मीन** : व्यवसाय-धंद्यात बदल घडेल.

## जनसंवाद

### श्रीराम मिल चौकात कबुतरखाना नको...

कबुतरांच्या विष्ठेतून व पिसांमधून श्वसनाचे आजार पसरत असल्याचे लक्षात आल्यानंतर मोठ्या प्रमाणात मुंबईतील कबुतरखान्यांना विरोध होत आहे, जो योग्यच आहे. मुंबईत विविध ठिकाणी गेल्या काही महिन्यांपासून अनधिकृतपणे कबुतरखाने उभे राहिले आहेत. ज्यामुळे नागरिकांना त्रास होतोय. कबुतरांना धान्य, चणे टाकल्यास महापालिकेकडून ५०० रुपये दंडाची नियमावली आहे. तसे फलकही काही ठिकाणी लावण्यात आलेले आहेत. तरीसुद्धा कबुतरांना चणे टाकण्याचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. वरळी येथील श्रीराम मिल चौकातही महिनाभरापासून कबुतरांचा उपद्रव वाढू लागला आहे कारण या चौकात सकाळीच चणे, धान्य काहीजणांकडून टाकले जाते. त्यांना विचारणा केली असता ते पुण्याचे काम आहे असे उलट उत्तर दिले जाते. महापालिकेने या ठिकाणीही दंडाचा उल्लेख असलेला फलक तातडीने लावावा आणि संभाव्य कबुतरखाना हटवावा.

– **दीपक काशिराम गुंडये,** वरळी

### महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरणे रास्तच

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा बोलली पाहिजे ही रास्त अपेक्षा आहे. मात्र आजही काही अमराठी अधिकारी व काही माजलेले परप्रांतीय मराठीत बोलायला तयार नसल्याने त्यांना मराठी प्रेमींकडून चोप दिला जात आहे. मनसेसारख्या मराठीचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाकडून महाराष्ट्रातील बँका, पोस्ट ऑफिस, आयकर भवन, रेल्वे या व अशा अन्य कार्यालयातून मराठीचा कडवा आग्रह धरला असून तेथील अर्जही मराठीत असावेत अशी मागणी केली आहे. मनसेच्या या मागणीवर काही अधिकाऱ्यांच्या संघटनांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, आम्हाला देशभरात काम करताना बावीस भाषा शिकाव्या लागतील. अमराठी अधिकाऱ्यांची ही प्रतिक्रिया मुजोर स्वरूपाचीच आहे. जर दक्षिणेकडच्या राज्यात परप्रांतीय अधिकाऱ्यांची बदली झाली, तर ते तिकडची भाषा शिकतात मग महाराष्ट्रात मराठी शिकण्यास त्यांना काय अडचण आहे? याच मुजोरीमुळे मनसे सारखे पक्ष खळ्ळखट्याकचे आंदोलन करतात. असे आंदोलन झाल्यास सरकारपासून सर्वच जण त्यांना कायदा हातात न घेण्याचे आव्हान करतात. वास्तविक जर अमराठी अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात आणि अस्थापणात मराठीचा वापर केला तर मनसेसारख्या मराठीचा पुरस्कार करणाऱ्या पक्षांना कोणतेही आंदोलन करावे लागणार नाही. महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरणे रास्तच आहे.

– **श्याम ठाणेदार,** दौंड

### परप्रांतीयांसह, मराठी जनांनापण मराठीचे वावडे !

महाराष्ट्र राज्य स्थापन झाले ते मराठी भाषिक राज्य म्हणून. भाषावार प्रांत रचनेनुसार महाराष्ट्र राज्याची भाषा मराठी. ६५ वर्षांत महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेचा वापर शासकीय कामकाजात करावा म्हणून अनेकदा शासन निर्णय आदेश पारित केले तरही मराठी भाषिक असलेल्या राज्यात 'मराठी' भाषेचा आग्रह धरावा लागतो हे दुर्दैव. महाराष्ट्रात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना याचसाठी केली. शिवसेना अंगीकृत स्थानीय लोकाधिकार महासंघ स्थापन करून केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, निमशासकीय आस्थापनांमध्ये ८० % टक्के मराठी स्थानिक उमेदवारांना नोकरीत स्थान देण्यात यावे ही मागणी मान्य करून घेतली. सुधीर (भाऊ) जोशी, गजानन कीर्तिकर यांनी लोकाधिकार समिती महासंघाचे धोरण केंद्र सरकारच्या बँका, आयकर खाते, पोस्ट आणि तार खाते, तेल कंपन्या, दोन्ही मार्गावरील मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, एअर इंडिया,पोर्ट ट्रस्ट, आयुर्विमा इत्यादी अनेक शासकीय, निमशासकीय कार्यालयातील नोकरीत भरतीत मराठी उमेदवारांना रोजगार मिळवून दिले. परप्रांतीय लोक मराठी भाषा उत्तम बोलणारे आहेत. पण आमचे मराठी भाषिक असून हिंदी, इंग्लिश, गुजराती भाषेत बोलून कोणाचा अपमान करीत आहेत याचे त्यांना भान नाही. शिवसेना संघटना मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी ५६ वर्षे लढली, शिवसेनेने लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून दिले याचा विसर पडला म्हणून की काय हाच मराठी माणूस शिवसेना सोडून जाताना दिसतो तेव्हाच परप्रांतीयांचे महत्त्व महाराष्ट्रात वाढीस लागत आहे. आज नोकरीतील परप्रांतीय उमेदवारांचा परिणाम मराठी उमेदवारांना भोगावा लागतो आहे.

– **महादेव गोळवसकर,** कुर्ला

### बिगर हिंदूंच्या जमिनीबाबत धोरण एकसारखे हवे

देशातील अल्पसंख्यांक म्हणजेच बिगर हिंदू विशेषतः मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदाय किंवा त्यांच्या धार्मिक संस्थेच्या ताब्यात देशभरातील सर्वाधिक जमीन आहे असे समजत आहे. देशाच्या विकासासाठी अशा जमीनी वेळोवेळी उपलब्ध होत नाही उलट धर्मप्रसारासाठी मात्र जमीनीचा पुरेपूर उपयोग होत आहे ही बाबच चिंतेची ठरु शकते. ऑर्गनायझर चा लेख सुद्धा असेच काहीतरी म्हणत आहे. म्हणूनच अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि देशाच्या सुरक्षिततासाठी सर्व बिगर हिंदूंच्या त्यांच्या धार्मिक संस्थेच्या ताब्यातील जमिनीसाठी सरकारचे एकसारखे धोरण असायला हवे, असे वाटते.

– **संजय गंगाराम साळगांवकर,** कुर्ला

### देशभक्त भारत हरपला...

हिंदी चित्रपटसृष्टीत ज्यावेळी राजकपूर, दिलीपकुमार, देव आनंद अशा दिग्गज अभिनेत्यांचा काळ होता, त्या काळात मनोजकुमार यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी प्रतिमा निर्माण केली होती. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ आपल्या सिने कारकिर्दीत देशभक्ती आणि भारतीय संस्कृती, स्वाभिमान गाजविणारे चित्रपट बनविणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. महत्वाकांक्षा त्यांची जबरदस्त होती. दिलीपकुमार यांचा आदर्श घेऊन ते चित्रपटसृष्टीत आले होते. दिलीपकुमारांच्या 'शबनम' चित्रपटातील मनोज या नायकाच्या व्यक्तिरेखेचे नाव घेऊन पडद्यावर आले. इतकी भक्ती दिलीपकुमार यांच्यावर होती. १९५७ मध्ये फॅशन या चित्रपटातून मनोजकुमार यांनी हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केले. मनोजकुमार यांचे सर्वच चित्रपट तसे संस्मरणीय होते. थोर भगतसिंग यांच्या जीवनावरील 'शहीद' चित्रपटाने त्यांच्या कारकिर्दीला एक वेगळे वळण मिळाले. परंतु १९६२ मध्ये हरियाली और रास्ता, गुमनाम, वह कौन थी, हिमालय की गोदमे, नीलकमल, यांसारख्या अनेक चित्रपटांनी ओळख करून दिली; परंतु १९६७ साली उपकार या चित्रपटात जय जवान जय किसानचा नारा दिला. रोटी, कपडा और मकानमधून स्वातंत्र्योत्तर भारतातील गहन समस्या मांडण्यात आली. अशा अनेक चित्रपटांतून देशावासीयांच्या भावना व्यक्त केल्या. यांचं देशप्रेमाच्या भावनेतून त्यांना भारत हे नाव पडले; परंतु आपल्या देशात प्रेम आणि अभिमानाहून दुसरी कोणतीही मोठी भावना हे त्यांनी देशाला दाखवून दिले. मनोजकुमार यांना भारत सरकारचा पद्मश्री, फाळके पुरस्कार यांसारख्या अनेक प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. देशभक्तीची भावना जपणारा देशभक्त भारत हरपला. पण मनोजकुमार यांचे भारतीय चित्रपटातील योगदान नेहमीच देशवासीयांच्या लक्षात राहील.

– **सुनील कुवरे,** शिवडी

### उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !

सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक उकाडा सहन करावा लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानेही वर्तवला आहे. राज्यात काही ठिकाणी मुलांच्या परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात. बऱ्याचदा पालकही त्यांना पैसे देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात. आहारतज्ज्ञांच्या मते कोल्डड्रिंक्समध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साखर जास्त प्रमाणात पोटात गेल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. कोल्ड्रिंक्समध्ये असणाऱ्या साखर आणि अन्य रासायनिक घटकांमुळे मुलांचे दात किडण्याचा धोका संभवतो. थंड आणि रसायनयुक्त असलेले हे कोल्ड्रिंक्स दातांच्या मुळांना कमकुवत करतात. मुलांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याने मुलांमध्ये टाइप २ डायबिटीसचा धोका वाढू शकतो. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुतीच सरबते प्यावीत.

– **मोक्षदा घाणेकर,** काळाचौकी

### डिपॉझिट १० लाख, तर फायनल बिल किती ?

तनिषा भिसे या गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी दीनानाथ रुग्णालयात आणण्यात आले होते. मात्र क्रिटिकल शस्त्रक्रिया असल्याने १० लाख रुपये डिपॉझिट भरल्यानंतरच रुग्णाला दाखल करून घेण्याची भूमिका रुग्णालयाने घेतली होती. या गोंधळात उपचारास विलंब झाल्याने तनिषा यांचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. कितीही क्रिटिकल शस्त्रक्रिया असली तरी १० लाख रुपये डिपॉझिटची मागणी अवाजवी आहे असे वाटते. संबंधित डॉक्टर्सनी सुखरुप प्रसूतीसाठी येणाऱ्या खर्चाचा अंदाज घेऊनच डिपॉझिटची रक्कम रुग्णाकडे सांगितली असणार. डिपॉझिटची रक्कम एव्हडी मोठी तर सुखरूप प्रसूतीनंतर हॉस्पिटलचे बिल किती झाले असते याची कल्पना करवत नाही. धर्मादाय नावाखाली चालवली जाणारी रुग्णालये देखील किती नफेखोरी करतात हे यावरून दिसून येते.

– **बकुल बोरकर,** विलेपार्ले



## काव्यकोडी

**एकनाथ आव्हाड**

### माझं काय चुकलं ?

*आमच्या गावचा बबलू*
*आळशीच आहे फार*
*शब्दाला मात्र सदानकदा*
*लावीत बसतो धार*

*शाळेत एकदा तो*
*खूपच उशिरा आला*
*सरांनी विचारले त्याला,*
*'का रे उशीर झाला?'*

*बबलू म्हणाला, 'गुरुजी,*
*आज आळसच लय आला*
*म्हणूनच शाळेत यायला*
*उशीर मला हो झाला...!'*

*गुरुजी म्हणाले, 'अरे आपण*
*आळसाला शत्रू मानतो*
*प्रगतीच्या मार्गात आपल्या*
*अडथळा तो आणतो'*

*बबलू लगेच म्हणाला,*
*'गुरुजी, माझं काय चुकलं?*
*शत्रूवरती प्रेम करा,*
*तुम्हीच आम्हास सांगितलं.'*

*गुरुजींना कळून चुकले*
*बबलू बोलण्यात तरबेज*
*फार सोयीचा अर्थ काढून*
*करी समोरच्याला गपगार !*

*१) नाजूक हिरवी*
*कोवळी किती*
*लहानशा झुळकीनेही*
*कमरेत वाकती*

*जमिनीवर हिरवीगार*
*जणू शाल अंथरते*
*जनावरांचे लुसलुशीत*
*अन्न कोण होते?*

*२) श्री लिहून काहीजण*
*करतात सुरुवात*
*घरचा पत्ता लिहितात*
*उजव्या कोपऱ्यात*

*मायना लिहून*
*नमस्कार करतात*
*शेवटी ता.क. लिहून*
*गोडी कोण वाढवतात?*

*३) झाड होऊन*
*शितल छाया धरतो*
*झरा होऊन*
*खळखळून हसतो*

*नदी होऊन*
*पुढे जाण्यास सांगतो*
*देण्यातला आनंद कोण*
*लुटण्यास शिकवतो?*

उत्तर -
१) गवत
२) पत्र
३) निसर्ग

eknathavhad23 @gmail.com

## बक्षीस जिंका

चित्र रंगवून
ई-मेल करा आणि
बक्षिसे जिंका
चित्रासोबत नाव
व पत्ता लिहून
पाठवणे.

kilbil@
prahaar.co.in

**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोत्कृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेता :**
**धृवी मंगेश हीर्लेकर**
**शाळा : झेड.पी.पी.एस. हिंडले भंडारवाडा देवगड ४१६६३०**

**परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव**
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.





# हिवाळ्यातील बर्फ



**कथा**
**प्रा. देवबा पाटील**

आता स्वरूप नियमितपणे दररोज सकाळी आजोबांसोबत फिरायला जात होता. चालता चालता तो आजोबांना काही ना काही प्रश्न विचारत होताच.

"बर्फ कसा पडतो हो आजोबा? आणि कधी कधी तर पावसातही बर्फ कसा पडतो?" स्वरूपने प्रश्न विचारले.

"आता हिवाळ्यात ज्यावेळी ज्या ठिकाणी अतिशय थंडी पडते, त्यावेळी वातावरणातील गारव्यामुळे ढगांतील जलबिंदूंचे हिमकणांत रूपांतर होते. असे अनेक हिमकण एकत्र आल्याने त्यांचे बर्फ बनते आणि ते जास्त साचले म्हणजे त्या दिवसातील पावसाच्या वेळी त्या भागात पावसाऐवजी हिमवर्षाव होतो. प्रखर थंडीमुळे हे बर्फ वितळत नाही नि जमिनीवर जिकडे तिकडे बर्फाचा थर साचतो." आनंदरावांनी सांगितले.

"आजोबा बर्फ घन असून पाण्यावर कसे तरंगते?" स्वरूपने प्रश्न केला.

आजोबा सांगू लागले, "कोणताही पदार्थ हा एखाद्या द्रवात बुडेल का तरंगेल हे त्या पदार्थाच्या व द्रवाच्या घनतेवर अवलंबून असते. जर पदार्थाची घनता द्रवाच्या घनतेपेक्षा कमी असेल, तर तो पदार्थ द्रवामध्ये तरंगतो आणि जर पदार्थाची घनात द्रवाच्या घनतेपेक्षा जास्त असेल, तर तो पदार्थ त्या द्रवामध्ये बुडतो.

कोणत्याही द्रवाचे जेव्हा घन पदार्थात रूपांतर होते तेव्हा त्याचे रेणू जवळ आल्याने तो आकुंचन पावतो नि त्याचे आकारमान कमी होते आणि त्याची घनता वाढते. त्यामुळे घन पदार्थ हा द्रव पदार्थापेक्षा वजनदार असतो. असा जड पदार्थ द्रव पदार्थात बुडतो; परंतु पाण्याचे बर्फ होताना मात्र ते आकुंचन पावण्याऐवजी प्रसरण पावते व त्यामुळे त्याचे आकारमान वाढते. पाण्याच्या या आचरणाला "असंगत आचरण" असे म्हणतात. त्यामुळे त्याची घनता पाण्यापेक्षा कमी होते. पाण्यापेक्षा त्याचे वजन कमी होते. तो हलका होतो म्हणून पाण्यात न बुडता पाण्यावर तरंगतो. वास्तविकतः त्याचा वरचा एक अष्टमांश भाग पाण्याबाहेर तरंगतो व खालचा सात अष्टमांश भाग पाण्यात राहतो."

"मग पाण्याचे बर्फ झाल्यावर बर्फाचे घनफळ जास्त का होते?" स्वरूपने विचारले.

"पाण्याचा बर्फ होतो म्हणजे पाण्याचे स्फटिकात रूपांतर होते. स्फटिकातील रेणूंची रचना नियमबद्ध असते. हे स्फटिकाचे रेणू नियमित व विशिष्ट अंतरावर स्थिर झाल्यामुळे एका ठरावीक संख्येतील पाण्याचे रेणू द्रवरूप अवस्थेमध्ये जेवढी जागा व्यापतात तेवढ्याच संख्येचे रेणू घनरूप अवस्थेमध्ये त्यापेक्षा जास्त जागा व्यापतात. म्हणून पाण्याचे बर्फात रूपांतर झाले म्हणजे त्याचे घनफळ वाढते." आनंदरावांनी सांगितले.

"पाण्याला तर रंग नाही, पण बर्फ रंगाने पांढरा का दिसतो?" स्वरूपने प्रश्न केला.

"एखादा रंगीत पदार्थ हा रंगीत का दिसतो हे माहीत आहे का तुला?" आनंदरावांनी विचारले.

"नाही आजोबा," स्वरूपने उत्तर दिले.

आनंदराव सांगू लागले, "सूर्यप्रकाश हा सात रंगांनी मिळून बनलेला पाढंरा प्रकाश असतो. एखाद्या रंगीत पदार्थावर जेव्हा हे पांढरे प्रकाशकिरण पडतात तेव्हा त्या पदार्थाच्या रंगाव्यतिरिक्त इतर रंगकिरण त्या पदार्थात शोषले जातात नि त्या पदार्थाच्या रंगाची रंगकिरणंच तेवढी परावर्तित होतात म्हणजे त्या पदार्थाच्या पृष्ठभागावरून मागे परत येतात व आपणास तो पदार्थ रंगीत दिसतो. एखाद्या वस्तूने सर्व सप्तरंगांचा प्रकाश शोषून घेतला, तर ती काळी दिसते व एखाद्या वस्तूने प्रकाशातील कोणताच रंग शोषला नाही नि सर्वच रंग परावर्तित केले, तर ती पांढरी दिसते."

आजोबा पुढे सांगू लागले, "तसेच डोळ्यांच्या अंतःपटलावर लाखो मज्जापेशी असतात. डोळ्यांवर पडणारा प्रकाश हा डोळ्यांतील भिंगामुळे या विशिष्ट प्रकारच्या ग्राहक पेशींवर केंद्रित होतो. या प्रकाशामुळे त्या पेशींमध्ये रासायनिक क्रिया घडतात. त्यांपासून एक सांकेतिक विद्युतलहर निर्माण होते. वेगवेगळ्या रंगाच्या प्रकाशामुळे वेगवेगळ्या रासायनिक प्रक्रिया घडतात व विविध विद्युतलहरी निर्माण होतात. या सर्व लहरी शेवटी मेंदूत जातात. मेंदू या संदेशांची योग्य जुळवाजुळव करतो व आपणास डोळ्यांना दिसणाऱ्या रंगांचा बोध होतो."

अशा रीतीने ज्ञानविज्ञानवर्धक गप्पाटप्पा करीत ते दोघे परत आले.

# कुत्र्याचं पिल्लू !



**कथा**
**रमेश तांबे**



एक कुत्र्याचं पिल्लू होतं. छोटसं, चुणचुणीत, तपकिरी रंगाचं. सारे त्याला आवडीने प्यारे म्हणून हाक मारायचे. "प्यारे" अशी हाक आली की, तो उड्या मारत यायचा. पायाशी लोळण घ्यायचा. आपल्या अंगाला अंग घासायचा. घरातल्या लहान मुलांबरोबर खेळायचा. त्यांना सतवायचा. कधी सईची बाहुलीच पळव, तर कधी दादाचं पुस्तक! त्याच्या खोड्या दिवसभर चालायच्या. त्या नुसत्या बघत बसलं तरी वेळ आनंदात जायचा. सर्व घराला प्यारेने वेड लावलं होतं.

खरे तर प्यारेचा, कुत्राच्या पिल्लाचा त्रास कुणालाच नव्हता. घरात ओरडणं नाही, की घाण करणं नाही. तो अगदी शहाण्या मुलासारखा वागायचा. त्यामुळे "प्यारे" साऱ्या घराच्या गळ्यातला ताईत बनला होता. एकदा दादाची घरात पार्टी होती. दादाचे पाच-सहा मित्र आले होते. आई-बाबा सईला घेऊन मावशीकडे गेले होते. त्यामुळे दादा आणि प्यारे दोघेच घरात होते आणि म्हणूनच दादाने पार्टीचे नियोजन केलं होतं. खाण्यासाठी पिझ्झा, बर्गर, फ्रँकी, सँडविच, आइस्क्रीम अशी जोरदार तयारी होती. मग रात्रभर खाणंपिणं सुरू होतं. प्यारेला आज आपण जेवण वाढलंच नाही हे दादाच्या लक्षातच आलं नाही. मग प्यारेनेसुद्धा पिझ्झा, बर्गरवर ताव मारला. आइस्क्रीमचे दोन कप चाटून पुसून खाल्ले. खूप खाल्ल्यामुळे प्यारेचे पोट चांगलेच टम्म झाले. मग घराच्या कुठल्या तरी एका कोपऱ्यात तो लगेच झोपी गेला.

दुसरा दिवस उजाडला. पहाटे लवकर उठून दादाचे मित्र आपापल्या घरी गेले. दादाने सारे घर आवरले आणि स्वतःची तयारी करून तो अभ्यासाला बसला. एवढ्या वेळात त्याला प्यारेची जराही आठवण झाली नाही. तेवढ्यात दारावरची बेल वाजली. आई-बाबा आले होते. सई धावतच घरात शिरली आणि प्यारे प्यारे अशी हाक मारू लागली. रोज बेल वाजताच दरवाजाजवळ धावत येणारा प्यारे आज का आला नाही म्हणून बाबांच्या मनातही शंकेची पाल चुकचुकली. तोच आई म्हणाली, "अरे दादा, आपला प्यारे कुठे गेलाय. तो घरात दिसत कसा नाही? तेव्हा कुठे दादाच्या डोक्यात प्रकाश पडला. अरेच्चा आपण कालपासून प्यारेकडे बघितलेच नाही. त्याने काय खाल्ले? काय प्यायले? तो कुठे झोपलाय? काहीच माहीत नाही. "असेल इथेच कुठेतरी!" दादाने वेळ मारून नेली. तेवढ्यात सई रडत रडत आली आणि म्हणाली, "बाबा बाबा आपला प्यारे तिकडे बाल्कनीत झोपलाय. मी त्याला उठवले तरी तो उठत नाही." मग आई-बाबा धावतच बाल्कनीच्या दिशेने गेले. पाहतात तर काय "प्यारे" खरोखरच अगदी गाढ झोपला होता. बाबांनी त्याला पाहिले तर त्याचे पोट टम्म फुगले होते. पण श्वास चालू होता. डोळे मात्र बंद होते. आता मात्र दादाच्या छातीत धस्स झाले. त्याचे काही बरे-वाईट झाले तर? या विचाराने तो घाबरला. बाबांनी लगेच गाडी काढली आणि प्यारेला कुत्र्यांच्या डॉक्टरकडे नेले.

पंधरा मिनिटांच्या तपासणीनंतर डॉक्टर म्हणाले, "घाबरण्याचे काही कारण नाही. मी त्याला औषध दिले आहे. पण त्याच्या खाण्यापिण्यावर लक्ष ठेवले पाहिजे. काल त्याने मनसोक्त पिझ्झा, बर्गर, वडापावसारखे काहीतरी पौष्टिक नसलेले पदार्थ खाल्ल्यामुळे त्याचे पोट फुगले आहे. इतके की त्यात त्याचा जीवही गेला असता. बरे झाले आपण त्याला लवकर दवाखान्यात आणले.

आता मात्र आईचा पारा चढला. "काय रे दादा, त्याला पिझ्झा कोणी दिला? तू आणला होतास का घरात?" दादाला आपली चूक समजली. तो बाबांना म्हणाला, "बाबा मी चुकलो. काल माझी मित्रांसोबत पार्टी होती. तेव्हा मी हॉटेलमधून सारे पदार्थ मागवले होते. मित्रांच्या नादात प्यारेने काय खाल्ले ते मी बघितलेच नाही!" डॉक्टर म्हणाले, "बघितलंस पिझ्झा, बर्गर, फ्रँकी या सारखे पदार्थ एखाद्याच्या जीवावर उठू शकतात. त्यामुळे असे पदार्थ खाणे बंद केले पाहिजेत. थोड्याच वेळात प्यारेने डोळे उघडले. त्यांने दादाकडे बघून पाय हलवले. दादाने त्याला पटकन उचलून घेतले. त्याचे पटापटा मुके घेतले आणि म्हणाला, "चुकलो मी! मला माफ कर. यापुढे तुलाच काय; पण मीसुद्धा कधीच असे अपायकारक पदार्थ खाणार नाही!

# दोष कोणाचा ?

**प्रतिभारंग**
**प्रा. प्रतिभा सराफ**





खरं तर आपण जग पाहण्यासाठी जातो तेव्हा परदेशातील माणसांबरोबर आपल्या भारतीयांनाही अनुभव येतच असतो. प्रत्येक प्रवासामध्ये चांगली-वाईट माणसे भेटत जातात. आपल्याला काहीतरी शिकवत जातात. एका प्रवासादरम्यान आमचा एक सोबती होता साधारण पाच फूट उंचीचा असावा. काळा सावळा, कडक इस्त्रीचे कपडे घालून वर जॅकेट घालून फिरणारा. सोबतीच्या सर्व पुरुष माणसात उंचीमुळे असेल किंवा वागणुकीमुळे थोडासा वेगळा भासणारा.

पहिल्याच दिवशी जेवणाच्या टेबलावर आमच्या ताटाकडे पाहून त्याने विचारले, "हे तुम्ही कसे काही खात आहात?" आम्ही त्याला उत्तर दिले, "ही कढीतली भजी आहेत." तो म्हणाला, "म्हणजे नक्की शाकाहारीच आहे ना?" आम्ही हसून उतरलो, "हो शंभर टक्के..." तो म्हणाला, "नाही त्या आकारावरून मला असे वाटले की..." आणि हसत हसत तिथून निघून गेला.

खरंतर तिथे ठेवलेले प्रत्येक पदार्थ शाकाहारी आहेत की मांसाहारी आहेत हे कळण्यासाठी व्यवस्थित हिरवे आणि लाल गोल आकाराचे चिन्ह करून त्याच्यापुढे त्या त्या पदार्थाचे नाव इंग्रजीमध्ये लिहिलेले होते. असो.

साधारण बारा ते चौदा तासांचा प्रवास करून विमानतळावर उतरलो होतो. इतके जास्त दमून आल्यावर प्रत्येकाला विश्रांतीची आवश्यकता जाणवत होती अशा वेळेस साधारण दोन तास आम्ही विमानतळावरच होतो याचे कारण म्हणजे हाच माणूस! सगळेजण बाहेर आले तरी हा माणूस सापडत नव्हता. गंमत म्हणजे त्याची बायको आमच्यासोबत होती. परदेशात जाताना त्याने तिकडचे कार्ड न घेतल्यामुळे त्याचा मोबाईल बंद होता अशा वेळेस त्याला संपर्क करणे, त्याला शोधणे कठीण होते. शेवटी आमचा पर्यटन मार्गदर्शक पंधरा डिग्री तापमानातसुद्धा घामेजोखिल झाला होता. त्या विमानतळावर एका वेळेस चाळीस माणसे बसण्याएवढी जागाही नव्हती. विमानातून उतरल्यावर सर्वांनी सोबत राहण्याचा आणि हातात असलेल्या झेंड्याकडे पाहात प्रवास करण्याचा सल्ला मार्गदर्शकाने आम्हा सर्वांना दिला होता. मार्गदर्शकाकडे केवळ त्याचा फोटो असल्यामुळे तो त्याचा शोध घेऊ शकला बाकी एकमेकांची तशी अजूनही ओळख झालेली नव्हती. तो जेव्हा समोर आला तेव्हा सगळेच त्याच्यावर चिडलेले होते तरी त्यातल्या एका माणसाने त्याला सहज विचारले, "तुम्ही कसे काय हरवलात?" त्याने उत्तर दिले, "या प्रचंड मोठ्या विमानतळात मला बाहेर जायचा मार्ग सापडत नव्हता आणि इथे या देशात कोणालाच माझी भाषा कळत नव्हती." दुसऱ्या दिवशी मार्गदर्शकाने आम्हाला सांगितले की हा माणूस 'स्मोकिंग झोन' पाहून त्याच्या आत शिरला आणि आपल्या संपूर्ण ग्रुपपासून वेगळा झाला. आपण कुठे आहोत, आपल्याला कुठे जायचे आहे याचे विस्मरण सिगारेट ओढणाऱ्या या माणसाला थोडे तरी हवे होते. या माणसामुळे आमचे तब्बल दोन तास वाया गेले होते!

एके दिवशी एका पर्यटन स्थळी एकच स्वच्छतागृह होते आणि तिथे देशविदेशातील महिलांबरोबर आमच्या सहलीतल्या काही महिला रांगेत शांतपणे उभ्या होत्या. तिथे हा माणूस आपल्या पत्नीला घेऊन आला. पत्नी व्यवस्थित रांगेत उभी राहिली, तर तो तिला म्हणाला, "असं बाजूने पुढे जा. किती वेळ थांबशील या रांगेत...?" खरंतर ती पुढे गेली असती तर तिथे आमच्यासहित विदेशातील महिलासुद्धा काहीच बोलल्या नसत्या; परंतु मला मात्र राग आला. मी म्हटले, "सर सगळेजण स्वच्छतागृह वापरण्यासाठी इथे रांगेत उभे आहेत त्यामुळे त्या रांगेतून पुढे आल्या तर बरं होईल आणि त्यांना घेतल्याशिवाय आपली बस काही इथून हलणार नाही. आम्ही आहोतच ना सोबत."

तो कसेनुसे हसून तिथून निघून गेला. बाजूलाच स्वच्छतागृहाबाहेर पुरुषांची रांग मला दिसत होती. तिथे नजर टाकली, तर हा दिसला नाही आणि दोन-तीन मिनिटानंतर मला तो चक्क स्वच्छतागृह बाहेर येताना दिसला याचा अर्थ नक्कीच मध्येच घुसला असणार! साधारण वीस ते बावीस जेवणाच्या वेळेस मी या माणसाला पत्नीसहित जेवणाच्या रांगेत घुसताना व्यवस्थित पाहिले होते.

आम्ही जेव्हा परतीच्या प्रवासात होतो तेव्हा विमानतळावर सर्वजण रांगेत उभे होतो. रांग तशी मोठी होती आणि हळूहळू सरकत होती. हा माणूस आपल्या पत्नीसह माझ्या मागे होता. अचानक पाहिले तर हा रांगेसाठी बांधलेल्या काही दोऱ्यांना पार करत बिझनेस क्लास काऊंटरवर पोहोचला होता. तिथे जाऊन काय बोलले माहीत नाही; परंतु तिथे पोहोचल्यावर त्यांनी आपल्या पत्नीला ही अशाच दोऱ्यांच्यामधून बिझनेस क्लासपर्यंत बोलवले आणि पाच मिनिटांमध्ये दोघेजण तिकीटे घेऊन बाहेर पडले. शेवटी या सहलीतल्या प्रत्येकालाच एकाच विमानात चढायचे होते आणि एकाच वेळेस परतायचे होते अशा तऱ्हेने पुढे जाऊन त्याने काय साधले माहीत नाही.

खरंतर यांच्या खूप साऱ्या गमती आहेत; परंतु शेवटची गंमत सांगते. आम्ही विमानात चढलो. शांतपणे बसलो. आठ तासांचा प्रवास करायचा होता. अचानक हा माणूस समोरून येताना दिसला. विमानात चढल्यावर त्याला सपत्नीक माझ्या दोन सीट मागे बसलेले व्यवस्थित पाहिले होते. समोरून हा कसा काय आला, असा मनात विचार आला. त्यानंतर कमीत कमी दहा ते पंधरा वेळा या माणसाला या संपूर्ण विमानात फेऱ्या मारताना पाहिले. हे काय कमी म्हणून त्याची पत्नीसुद्धा कदाचित त्याच्या सांगण्यावरून विमानात फेऱ्या मारत होती. एखाद्या बागेत फिरतात तसे ते फिरत होते. विमानातून चालताना आपल्याला आजूबाजूच्या सीटला धरत धरत पुढे जावे लागते अशा वेळेस काही झोपलेल्या माणसांना धक्का लागून ते उठत होते. काहींचे पाय बाहेर आलेले होते त्यांना धक्का लागत होता याचे भान या दोघांना नव्हते. त्यांना या विमानात चालण्याचा व्यायाम करायचा होता की आणखी काही दाखवून द्यायचे होते कोणास ठाऊक?

खूपदा समोरची माणसे चुकीचे वागतात हे पाहूनसुद्धा इतर माणसे काहीच बोलत नाहीत याचाही हे फायदा घेतात. त्यांना जे वाटते ते ते करत राहतात. वयस्कर माणसांना बोलता येत नाही परंतु विक्षिप्त माणसांचे करायचे काय? याचा दोष त्यांना द्यायचा की आपण घ्यायचा?

pratibha.saraph@ gmail.com

# मोठ्या सुट्ट्यांचा सदुपयोग असा करा...

**लहानशा गोष्टी मोठा अर्थ**
**शिल्पा अष्टमकर**







विद्यार्थी मित्रहो, रोजची शाळा व दैनंदिन कार्यक्रम यातच तुमचा सगळा दिवस जातो. याशिवाय आणखी कितीतरी गोष्टी तुम्ही करावयास हव्यात. पण त्याला वेळ कुठे आहे असे तुम्ही विचाराल. पण तुम्हाला मोकळे दिवस खूप असतात. प्रत्येक आठवड्याचा रविवार, अन्य सणावारांच्या सुट्ट्या, गणपती, दिवाळी, वार्षिक परीक्षा झाल्या दिवसापासून जून महिन्यापर्यंत सुमारे शंभर दिवस तुम्हाला शाळा नसते. मुलांनो, हे सुट्टीचे दिवस तुम्हाला कितीतरी चांगल्या गोष्टीसाठी वापरता येतील.

काय करावे? या दिवसात खूप वाचन करा. गोष्टींची पुस्तके वाचा. शास्त्रीय पुस्तके वाचा. काय वाचले? याची नोंद ठेवा. एखादा छंद जोपासा, चित्रे काढा, कविता करा, क्रिकेट, बुद्धिबळ, कॅरम यांसारख्या खेळांचे शिक्षण घ्या. घरातली लहान सहान कामे बिन तक्रार करा. आपल्या घराची सफाई करा. घरची बाग असेल, तर बागेत काम करा. आपले अंथरूण-पांघरूण स्वतः उचला, नीट घड्या घाला, तिथल्या तिथे व्यवस्थित ठेवा. दिवाळी व उन्हाळी सुट्टीत आवडीच्या शिबिराला जा. खूप ओळखी होतात. नवीन पाहावयास, शिकावयास व ऐकावयास मिळते. बुजरेपणा जातो. चार लोकांत कसे बोलावे, त्यांच्याशी कसे वागावे हे समजते. तुमचे हस्ताक्षर कसे आहे? खराब अवाचनीय हस्ताक्षर हा मोठा दोष आहे. सुवाच्य सुंदर, आकर्षक, वळणदार हस्ताक्षर हा माणसाचा अलंकार आहे. परीक्षेत त्याचा फार फायदा होतो. मोठेपणी अक्षर सुधारता येत नाही व वेळही मिळत नाही. लेखन सुंदर असून भागत नाही ते शुद्धही असले पाहिजे. भरभर शुद्ध सुंदर लिहावयाचा सराव करा. यामुळे सुट्टीचे दिवस फुकट जाणार नाही. गेलेला क्षण परत मिळविता येत नाही. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण अनमोल असतो हे लक्षात ठेवा.



# तथागत बुद्धांच्या मूल्यांचे अविष्करण

## जयभिम महोत्सव — मडवॉक नाटकाने जिंकली रसिकांची मने

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:समुदायाच्या सृजनशील आणि धार्मिक विकासात बुद्धांच्या मूल्यांचे अध्ययन, अविष्करण आणि शाश्वत रुजवणूक, या विषयावर तीन विद्यार्थी एचडी करण्यासाठी गुफांमध्ये येतात, त्या गुफांमध्ये आल्यानंतर बेंजामिन नावाचा गाईड त्यांना भेटतो त्यांना तो बुद्धाचे तत्त्वज्ञाने टर्मिनोलॉजीमध्ये न सांगता तर अनुभवातून सांगतो. असा विषय मडवॉक नाटकात दाखविण्यात आला असून कबीर जाधव यांच्या सरस अभिनयाला रसिकांची दाद मिळाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने सामाजिक न्याय भवन येथे ४ ते १४ एप्रिल रोजी जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.७) एप्रिल रोजी मडवॉक आणि रुपेश निकाळजे यांचा क्रांतीचा साक्षीदार या नाटकांचा प्रयोग झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा.राहुल सोनवणे, प्रमुख पाहुणे संजय पाटील देवळाणकर, एस.टी. गायकवाड आदी उपस्थित होते.मडवॉक नाटकातुन बुद्धांचे तत्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत रंगमंचावर सादर करण्यात आले.त्याचबरोबर बुद्धांच्या लेण्यांचे व त्यांच्या मुर्त्यांचे खंडन व चोरी यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. बुद्धाला केवळ वचनापुरते न ठेवता, आचरणात आणावे हा संदेश मडवॉक नाटकातून देण्यात आला. मडवॉक नाटकाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. नितीन वडमारे यांनी केले.आभार प्रा.अशोक गायकवाड यांनी मानले. जयभीम महोत्सवातील उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.




बीड: येथील जयभिम महोत्सवात मडवॉक नाटक सादर करतांना कलाकार. (छाया: प्रकाश वडमारे)

### यांनी साकारल्या भूमिका...

श्रीपाद देशपांडे लिखित मडवॉक नाटकाचे दिग्दर्शन कबीर जाधव यांनी केलं असून अभिनयही साकारला आहे.त्याचबरोबर नेपथ्य अमित गाडे, शरद भांगरे, संगीत आकांक्षा डंबाळे, प्रकाश योजना अमन तांगडे, रंगभूषा लक्ष्मीकांत दोडके, रंगमंच व्यवस्था शुभम चव्हाण, सागर धन्वे, हर्षवर्धन जावळे, कलाकार श्रद्धा दातखीळ, शुभम चव्हाण, अभिषेक इनकर, शरद भांगरे यांनी भूमिका साकारल्या आहेत.

# कापरेवाडी जलजिवनमध्ये बोगसगिरी

**बोंबला:**जुन्या विहीरीच्या नावावर लाटला निधी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील कापरेवाडी गावांमध्ये जलजिवन योजनेत भुरट्या गुत्तेदारांने लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे तसेच जलजिवच्या कामात मंजूर करण्यात आलेल्या विहीर खोदली नाही जुण्या विहीरीला नवीन कडे टाकुन नवीन विहिर नाही खोदता लाखो रुपये स्वताच्या घशात घालण्याचा प्रयत्न कापरेवाडी येथील जलजिवनचे काम करणाऱ्या भुरट्या गुत्तेदारांने केला आहे अशा गुत्तेदारावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे तसेच कापरेवाडी येथील येवढ्या मोठ्या प्रमाणात भ्राष्ठाचार करणार गुत्तेदार हा लाबचा नसुन केज तालुक्यातील आहे व एका बड्या नेत्यांचा चमचा सुध्दा आहे त्यामुळे अशा प्रकारे भोगस अर्धवट कामे करून संध्या कापरेवाडी गावांमध्ये पाणी पिण्यासाठी नाही व भुरटा गुत्तेदार मोकाट शेंगा हानत फिरत आहे तसेच गावातील नागरिकांनी काम पुर्ण करण्यासाठी व खोदलेल्या रस्ते दुरुस्ती करुन देण्यासाठी विचारणा केली तर उडवाउडवीची उत्तरे भुरटा गुत्तेदार गावातील नागरिकांना देत आहे तरी अशा भुरट्या गुत्तेदारावर खासदार, आमदारा , लोकप्रतिनिधी, प्रशासन कार्यवाही करणार का मुगिळुन गप्प बसनार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

# पशूसंवर्धन विभागाचे काम होणार गतीमान

**धोरण:**मंत्री पंकजा मुंडे यांचे महत्वाचे पाऊल

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी महत्वाचे पाऊल उचलले असून विभागातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्याअंतर्गत पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात पशुसंवर्धन



विभागाचे काम गतीने व पूर्ण क्षमतेने होण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील पशुधन विकास अधिकारी पद महत्त्वाचे आहे. सुधारित आकृती बंधानुसार महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ अंतर्गत पशुधन विकास अधिकारी संवर्गात एकूण ४६८४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यः स्थितीत १८८६ पदे भरलेली असून २७९८ पदे रिक्त आहेत. तसेच ३१ डिसेंबर २०२५ अखेर ८ पदे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार आहेत. असे एकूण २८०६ पदे रिक्त होणार आहेत. ही पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत होता. या गोष्टीची दखल घेत पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी पान २ वर

# ट्रेडिंग कंपनीवाल्याचा मनमानी

**चर्चा:**केज कृउबास अधिकारी प्रशासन हप्ता घेऊन गप्प?



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील चिंचोली माळी येथील गावातील ट्रेडिंग कंपनीवाल्यानी बेसुमार शेतकऱ्यांची आर्थिक लुट सुरू केली आहे चिंचोली माळी येथे गावात स्वायाबीन व इतर धान्ये खरेदी केले जाते अशा स्वायाबीन खरेदी केली जाणाऱ्या ट्रेडिंग कंपनीवाल्यानी मनमानी भाव ठरवुन अर्थीक फसवणूक शेतकऱ्यांची सुरू केली आहे कारण ट्रेडिंग कंपनीवाल्याचा भाव सकाळी वेगळाच भाव नंतर दुपारी आवक वाढली की दुपारी वेगळाच भाव तसेच आवक कमी झाली की वेगळाच भाव अशा प्रकारे मनमानी पद्धतीने भाव ठरवुन शेतकऱ्यांची पान २ वर

# ‘सुताड’ च्या टीम ने हाती घेतला उपक्रम

**सांस्कृतिक:**सामाजिक कार्यकर्त्यां स्मिता गद्रेची मध्यवर्ती भूमिका

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:अभिनय कारकीर्द सुरू करण्यासाठी कधीही उशीर झालेला नसतो. जेव्हा आणि जिथे शक्य असेल तिथे कृती करा. कास्टिंग कॉल्सना प्रतिसाद दया आणि ऑडिशनला उपस्थित राहा. सुरूवातीच्या कारकिर्दीच्या अभिनेत्यासाठी व्यावसायिक अनुभव निर्माण करणे आवश्यक आहे. असा सल्ला राष्ट्रीय फिल्म पुरस्कार विजेता दिग्दर्शक सुनील शिंदे यांनी नवोदित कलाकारांना दिला.

लेखक व दिग्दर्शक सुनील शिंदे हे ‘सुताड’ हा नवा चित्रपट प्रेक्षकांसाठी लवकरच घेऊन येणार आहेत. त्या संदर्भात ते पुण्यात आले असतांना त्यांनी चित्रपट सृष्टी संदर्भातील वास्तविक दर्शन घडविले. ‘सुताड’ चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक सुनील शिंदे, सहयोग दिग्दर्शक देवकुमार व सामाजिक कार्यकर्त्यां अभिनेत्री स्मिता गद्रे यांच्या हस्ते या चित्रपटाची स्क्रीप्ट आणि पोस्टरचे लॉन्चिंग करण्यात आले. या वेळी निवोदित कलाकरांना समजावून सांगतांना त्यांनी आपली भावना व्यक्त केली.



या चित्रपटात डॉ. काशीनाथ घाणेकर यांची पुतणी व गेल्या ३० वर्षापासून पिंपरी चिंचवड येथील कला व सामाजिक क्षेत्रात कार्यरत स्मिता गद्रे या मध्यवर्ती भूमिका साकार करतांना दिसणार आहेत. आपली भावना व्यक्त करतांना स्मिता गद्रे पान २ वर

# कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय?

**चर्चा:**केज तालुक्यात अनेक लॉज मालक मालामाल




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:मांजरसुम्बा ते केज दरम्यान तीन कला केंद्र आहेत सध्या केज तालुक्यात अवैद्य धंद्याने उच्छाद मांडला आहे दारू मटका लॉजवरील वेश्या व्यवसाय आणी हे कला केंद्र लोकनाट्य कलेच्या नावाखाली सरळ वेश्याव्यवसाय करून घेतला जातो अल्पवयीन मुलीकडुन डान्स करून घेतला जातो बठकीत शौकीन लाखो रुपयांची उधळपट्टी करतात या नादा पायी अनेक ग्राहकांचा संसार मोडला यात सर्व वयातील ग्राहक जातात त्यात तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर व्यसनात अडकला आहे या कला केंद्राच्या व्यसना पायी अनेकांचा संसार पान २ वर

# तुगावच्या पोलीस पाटीलांचा सन्मान

**दखलपात्र:** श्रुतिका हाजगूडेंचा सत्कार

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: धाराशिव जिल्ह्यातील तुगावच्या पोलीस पाटील श्रुतिका पाटील यांचा शनिवार दि.पाच एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य गाव कामगार संघ महाराष्ट्र आयोजित आदर्श पोलीस पाटील पुरस्कार सोहळा व मान्यवरांचा सत्कार समारंभ हा कार्यक्रम स्व.अंकुशराव लांडगे नाट्यगृह,भोसरी पुणे येथे संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य गाव कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.भिकाजी पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.ना.पंकज राजेश भोयर साहेब राज्यमंत्री–गृह (ग्रामीण),शालेय शिक्षण, गृहनिर्माण, सहकारआणि खनिकाम, भोसरी विधानसभे चे आमदार मा.श्री.महेश लांडगे साहेब आणि पुणे ग्रामीण चे पोलीस अधीक्षक मा.श्री.पंकज देशमुख साहेब, महाराष्ट्र



राज्य गावकामगार संघाचे राज्यध्यक्ष मा. बाळासाहेब शिंदे पाटील उपस्थित होते.पोलीस पाटील यांना देण्यात येणारा सर्वोच्च मा.राज्यपाल पुरस्कार प्राप्त राज्यातील विविध जिल्ह्यातील पोलीस पाटील यांना व पोलीस पाटील संघाच्या नूतन कार्यकारिणी सदस्यांना सन्मानचिन्हे देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.मौजे तुगांव ता.जि.धाराशिवच्या राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील सौ.श्रुतिका दत्तात्रय हाजगुडे पान २ वर

# कृषी मंत्र्याची हाकालपट्टी करा!

**निवेदन:**केज शिवसेना उबाटा गटाची मागणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने केज तहसीलदार यांना निवेद्वारे म्हटले आहे कृषी मंत्री ना. माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा – केज तालुका शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मागणी महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्याचा अवमान करणारे वक्तव्य केल्याबद्दल त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पान २ वर

## उपक्रम — विद्यार्थ्यांना कडधान्यासह फळ वाटप

# आदित्य फार्मसिच्या विद्यार्थ्यांची आनंदग्रामला भेट

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य फार्मसिच्या विद्यार्थ्यांनी भारतीय औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार बीड शहरापासून जवळ असलेल्या आनंदग्राम या संस्थेला भेट दिली. यावेळी तेथील अनाथ ६२ मुलांना कडधान्यासह फळ वाटप करण्यात आले.

भारतीय औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार अनाथ आश्रम भेट देण्याकरिता व मुलांना कडधान्य आणि फळ वाटप करण्यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य फार्मसिच्या ७० विद्यार्थ्यांनी बीड




शहरापासून जवळ असलेल्या पाली येथील आनंदग्रामला भेट दिली. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आदित्य फार्मसिचे प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे, इन्फंट इंडिया ट्रस्ट आनंदग्राम पालीच्या वैष्णवी उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर अनुजा सानप, प्रतीक्षा जाधव, प्रियंका नागरगोजे यांची उपस्थिती होती. डॉ. कुमार सुरवसे यांनी एच.आय. व्ही. ग्रस्त विद्यार्थ्यांचे जीवन व मुलांना तोंड द्यावी लागणारे आव्हाने या आजाराविषयी गैरसमज बाळगू नये. कधीही बरा न होणारा, अनेकांच्या मृत्यूचं कारण ठरलेला आजार म्हटला की समोर येणाऱ्या नावांच्या यादीत क्षखत एड्सचं नाव सुद्धा असतंच. कोणत्याही अन्य आजाराप्रमाणेच प्रतिकारशक्ती कमी करून शरीर क्षीण करणारी अशी ही स्थिती असली तरी त्याला जोडून येणाऱ्या सामाजिक दृष्टिकोनामुळे पान २ वर

# पालीच्या आनंदवनात अन्नदान

**कौतुकास्पद:**स्व.आदित्य भैया वाघमारेंच्या स्मरणार्थ उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

तेलगाव: कार येथील नवतरुण आदित्य श्री भाऊ वाघमारे याचा सहा महिन्यापूर्वी मृत्यू झाला होता का दिनांक सात एप्रिल रोजी बीड जवळील आनंदवनात त्याच्या स्मरणार्थ अनाथ बालकांना अन्नदान व वृक्षारोपण करण्यात आले. तेलगाव परिसरात आपल्या संघटन कौशल्याच्या बळावर मोठ्या प्रमाणावर तरुणांचे संघटन करून कोणाच्याही मदतीला तात्काळ पडणार व्यक्तिमत्व म्हणून आदित्य वाघमारे अल्प कालावधीत स्वतःची ओळख निर्माण केल्याने तो तरुण च्या गळ्यातील टाईप बनला होता. स्वर्गीय आदित्य वाघमारेच्या स्मरणार्थ होणाऱ्या खर्चाला फाटा देऊन इन्फंट इंडियातील निरागस बालकांना अन्नदान व वृक्षारोपण करण्यात पान २ वर